।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष १० वे ❖ अंक ५ वा ❖ मार्गशीर्ष – पौष शके १९३५ ❖ ३ डिसेंबर २०१३ ते १० फेब्रुवारी २०१४

**प्रकाशक व मुद्रक:**

**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर

{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}

संपर्क : ९८२०५४९४१५

Website - www.shridatt.org

**प्रकाशनस्थळ :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,

डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,

गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**

**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**

१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**


## अंतरंग


◆ भक्तगाथा ०३

◆ गोजिरवाणी - सौ. नीता कुलकर्णी ०७

◆ गुंजारव १ - सौ. प्रतिभा गोखले ०८

◆ गुंजारव २ - अपर्णा ०८

◆ भागिरथीच्या काठावर... ०९

◆ रुचि रुचि भोजन १०

◆ उत्सव विशेष ३५

◆ आमची शामला

अशी सखी - सौ. प्रतिभा गोखले ११

मधला गुरू - सौ. सुरेखा जोशी १४

लाडक्या ताई - गीता फाटक १५

गोड शेवट - दीपक फडे १६

माझी मैत्रीण शामला आजी - आरोही कुलकर्णी १८

शामला नव्हे मारो श्यामळो - लता मोघे १९

मरावे परी कीर्तिरूपी उरावे - अदिती २१

शामला मावशी वक्तशीर शिस्तप्रिय - सौ. रेश्मा २२

माझी आजी - सोहम जोशी २४

◆ श्रीसस कृष्णाताई जन्मशताब्दी सोहळा

व्यापक सद्‌गुरू - सौ. अमिता पाठक २६

गोपाळ भेट - लता मोघे ३१

करावा हाची अभ्यास - प्रदीप कुलकर्णी ३३

पहिला उत्सव ? नव्हे आनंदसोहळा

- प्रशांत शिवरकर ३६

सच्चिदानंद आपण - निशांत पाठक ४०

प्रेमभक्ती - अविनाश पाठक ४१

# संपादकीय... ✍

नुकताच श्रीसस दत्तमहाराजांचा पुण्यतिथी उत्सव पार पडला. या उत्सवात सातही दिवस महाराजांनी वेगवेगळ्या मार्गांनी **पहाते** व्हायला शिकवले. शेवटी ज्ञानात नुसतेच न शिरता प्रेमभक्तीत रंगून जायला सांगितले. खरं तर महाराजांना आपल्या शिष्याची वाटणारी कळकळच पदोपदी जाणवते. म्हणूनच ते आपल्या शिष्यांच्या उद्धारासाठी सदोदीत कार्यरत असतात. 'भक्तगाथे'तही श्री बलभीम महाराज शिष्याच्या कळवळ्याने त्याला भेटण्यास कसा लांबचा प्रवास करतात याचेच वर्णन आले आहे.

समरस होण्यास सगळी शास्त्रे कशी तोकडी पडतात हेच 'सदाचार' वाचताना जाणवेल. शास्त्रांना जाणण्यास अवघड असलेली वस्तू महाराज कशी सोपी करतात हे सर्वच गुरुभक्त जाणतात. त्यांच्या शब्दानुरूप गेल्यावर 'सदाचार'त वर्णीलेली ऐक्यता साधता येते.

महाराज नुसत्या शब्दांनीच सांगत नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीनेच समरसता शिकवतात. श्रीसस कृष्णाताई यांचा **जन्मशताब्दी सोहळा**, हैद्राबाद येथे १५ ऑक्टो., २०१३ ते १७ ऑक्टो., २०१३ चे दरम्यान उत्साहात व आनंदात पार पडला. तेथे जाऊन आलेल्या सर्वांना समरसतेचा खरा अनुभव मिळाला. ह्या उत्सवाचे वर्णन व त्यातील अनुभव काही गुरुभक्तांनी मांडलेला आहे. अनुपस्थित राहिलेल्या गुरुभक्तांना तो नक्कीच आवडेल. तसेच जाऊन आलेल्यांना त्याची उजळणी होईल.

अशा उत्सवांमधून महाराज आपल्याला व्यापकत्व दाखवित असतात. ते आपल्याला मर्यादित राहूच देत नाहीत. पण त्यासाठी आपण सतत तयार असायला हवे व आपली दृष्टीही शाश्वत सुखाकडेच हवी. याचेच बाळकडू 'गोजिरवाणी'त दिले आहे.

'पाझर'चे संपादन सहाय्य करणाऱ्या व मंदिरात सर्व कार्यात हिरीरीने भाग घेणाऱ्या गुरूभक्त सौ. शामला आपटे दि. २१ ऑक्टों., २०१३ रोजी ब्रह्मलीन झाल्या. त्यांच्या स्मृतीस सादर प्रणाम! बोलक्या स्वभावाच्या व मिळून मिसळून राहणाऱ्या शामलाताई सर्वच गुरुभक्तांच्या लाडक्या होत्या. याचे प्रत्यंतर सर्व वयोगटातील गुरुभक्तांनी वाहिलेल्या श्रद्धांजलीवरूनच लक्षात येते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू या 'पाझर'मध्ये दिसून येतील. गुरुसेवेत त्यांनी कधीही आळस केला नाही. **'गुरुने दिला ज्ञानरूपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा'** हे त्यांचे आवडते गाणे त्या नुसतेच गोड म्हणत नव्हत्या तर शेवटच्या श्वासापर्यंत ते त्या खऱ्या अर्थी जगल्या!

# भक्तगाथा... ✍

माळव्यात सीहोरपासून ४० मैलांवर 'नरसिंगड' नावाचे एक संस्थान आहे. तेथे रा.रा. नागेश आबाजी काथवटे नावाचे सद्गृहस्थ सन १९०६ साली नाझिम अदालत होते. श्री. नागेशराव हे मूळ सातारा जिल्ह्यातील वाई येथील राहणारे. त्यांची व धारचे रा.रा. काशीनाथपंत लेले यांची चांगली ओळख होती. नरसिंगड येथील व्हिक्टोरिया हायस्कूलमध्ये असिस्टंट मास्तरची जागा रिकामी होती. त्या जागी रा. काशीनाथपंत लेले यांच्या शिफारशीवरून रा. गणपतराव तांबे यांची नेमणूक करण्यात आली. नेमणूक झाल्यावर प्रथम ते श्री रा. काथवटे यांचेच घरी उतरले. गणपतराव सरळ स्वभावाचे व निस्सीम गुरुभक्त असल्यामुळे काथवटे यांच्या सर्व मंडळीस ते फारच प्रिय झाले. सुट्टीचे वेळात काथवटे यांच्या घरातील मंडळी यांस गणपतराव ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत वगैरे पारमार्थिक ग्रंथाचे श्रवण करवीत. त्यामुळे गुरुभक्तीचे थोडेसे बीज काथवटे यांच्या घरी पेरले गेले. गणपतराव नेहमी आपले गुरुचे म्हणजे श्रीबलभीमबोवांचे गुणवर्णन करीत असत. त्यामुळे काथवटे यांच्या घरात सर्व मंडळीस बलभीमबोवांचे दर्शन केव्हा होईल अशी उत्सुकता उत्पन्न झाली.

याच वेळी रा.रा. गोविंदराव गणेश वैद्य नावाचे सद्गृहस्थ नरसिंगडास इंजिनिअर होते. ते व त्यांची पत्नी भागिरथीबाई उर्फ ठकूताई या उभयतांस बरेच दिवसांपासून पारमार्थिक विषयाची गोडी असे. या उभयतांचा काथवटे यांच्या सर्व मंडळींशी फार स्नेह संबंध असल्यामुळे रा. गोविंदराव व ठकूताई नेहमी काथवटे यांचे घरी जात येत असत. त्यांनाही गणपतरावांचा स्वभाव व गुरु-भक्ति पाहून गुरूंचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. बोवांची आलेली पत्रे रा. काथवटे, गोविंदराव वगैरे मंडळीस गणपतराव वाचून दाखवीत. त्या पत्रांवरून काथवटे वगैरे मंडळीस बोवांविषयी आदर उत्पन्न झाला.

याच सुमारास श्रीबलभीमबोवांचा मुलगा दत्तात्रय याचा विवाह मु।। साडे येथे झाला. विवाहाकरिता शेदोनशे रूपयांचे कर्ज एका महिन्यात सावकाराकडून बोवांस काढावे लागले. कर्जाची रक्कम बोवांनी चार पाच महिन्यात फेडावयाची व रकमेस तारण म्हणून जमीन वगैरे काहीही सावकाराकडे गहाण ठेवावयाची नाही. असे बऱ्याच मंडळीसमक्ष सावकाराचे व बोवांचे ठरले होते, परंतु हा करार न पाळता, सावकाराने

दुसऱ्या एका ब्रह्मद्वेषी गृहस्थाचे नादी लागून, बोवांवर काही तरी खोटा आरोप ठेवण्याच्या हेतूने करमाळे येथील मामलेदार कचेरीत फिर्याद केली. नंतर नरसिंगडी गणपतरावांस बोवांनी एक पत्र लिहिले की, 'येथील काही लोकांनी आपल्या आनंदाकरीता वेड्यावर कुभांड रचिले आहे. तरी सत्याचा पाठीराखा प्रत्यक्ष पांडुरंग असल्याने शेवटी सत्याचाच जय व्हावयाचा. आपण काही काळजी करू नये. वेड्याचा संरक्षक परमात्मा समर्थ आहे,' अशा मजकुराचे पत्र बोवांनी गणपतरावांस पाठविले. गणपतरावांस ते पत्र वाचून फार वाईट वाटले व त्यांनी ते पत्र श्री. रा. नागेशराव काथवटे यांस वाचावयास दिले. त्यासही ते पत्र वाचून वाईट वाटले. करमाळे येथील मामलेदार आत्मारामपंत नूलकर हे रा. काथवटे यांच्या ओळखीचे होते. म्हणून मामलेदारसाहेबास रा. काथवटे यांनी गणपतरावांकडून एक तार करविली व त्यात बोवांच्या सज्जनतेबद्दल शिफारस केली व 'गावचे काही कुटाळ लोक बोवांस त्रास देतात, वास्तविक बोवा महान साधुपुरुष आहेत' असा मजकूर लिहिला. मामलेदारास ही तार मिळताच, त्याने फिर्यादी पक्षकारास बोलाविले व त्यांना दमदाटी देऊन पुन्हा अशी खोटी फिर्यादी न आणण्याबद्दल त्यांस बजाविले व फिर्याद काढून टाकिली. नंतर बलभीमबोवांस फिर्यादीची फिर्याद काढून टाकिली असे न सांगता त्यास विचारले की, 'नरसिंगडास गणपतराव तांबे या नावाचे गृहस्थ तुमच्या ओळखीचे आहेत काय?' बोवा म्हणाले 'होय' नंतर मामलेदाराने सांगितले की, ''त्यांचा जबाब आम्हांस या खटल्याचे कामी घेणे आहे, करीता त्यांस आम्ही समन्स काढणार आहोत; ते समन्साने न आले तर त्यांस पकड वारंट काढणार, कारण त्यांनी या संबंधाची एक तार मजला केली आहे,'' मामलेदाराचे हे शब्द ऐकताच, आपल्याबद्दल बिचाऱ्या गंपूस विनाकारणच त्रास होणार ही कल्पना मनात येऊन बोवांस अत्यंत वाईट वाटले, गंपूने मामलेदारांस तार का व काय केली हे त्यास कळेना. बोवांस गणपतरावांबद्दल वाईट वाटण्याचे दुसरे कारण असे होते की, गणपतरावांचे बंधु, मातोश्री वगैरे मंडळी अगोदरच बोवांनी गणपतरावांस बिघडवले असा ठपका देत होते व आता पुन्हा गंपूस बोवांनी सरकार दरबारांतही खेचले असा दुसरा ठपका आपणावर येणार असे त्यास वाटले, हा ठपका येऊ नये व तारेचाही खुलासा व्हावा म्हणून बोवा ताबडतोब एकटेच प्रथम धार येथील गणपतरावांचे बंधु गोपाळराव तांबे याचे घरी गेले. तेथे गोपाळराव वगैरे मंडळीस साडे येथील सर्व

हकिकत साग्र सांगितली व 'भिण्याचे काही कारण नाही त्या खटल्यात गंपूचा किंवा माझा काही दोष नाही.' असे पुष्कळ समजाऊन सांगितले. पण गोपाळरावांचे समाधान झाले नाही. शेवटी त्यांचा धाकटा बंधु विष्णु यास बरोबर घेऊन बोवा गणपतरावांस भेटण्याकरिता निघाले. वाटेत प्रथम सुजालपूर येथे मुक्काम केला.

सुजालपुरास रा. गोंदूभैय्या करकरे यांचे घरी बोवा उतरले. रा. गोंदूभैय्या हे भगवद्भक्त असल्याने त्यांनी बोवांची योग्यता जाणून गावात बऱ्याच प्रमुख ठिकाणी त्यांची कीर्तने करविली. तेथील बहुतेक लोकांस बोवा फारच मान्य झाले. सुजालपुर येथील रा. बाबासाहेब बक्षी, रा. माधवराव दांडेकर व त्यांच्या पत्नी वगैरे बऱ्याच भगवत्प्रेमी मंडळींना बोवांची एकंदर साधुवृत्ति पाहताच अत्यंत आनंद झाला. बाबासाहेब बक्षी व गोंदूभैय्या करकरे यांनी तात्काळ बोवांपासून अनुग्रह घेतला. रा. माधवराव दांडेकर, त्यांचे चिरंजीव बाबूराव दांडेकर व त्यांच्या पत्नी सीताबाई या सर्व मंडळीच्या मनात बोवांविषयी अत्यंत आदर उत्पन्न होऊन त्यांनी बोवांस राहण्याबद्दल बराच आग्रह केला. पण नरसिंगडी जाण्याची त्वरा असल्यामुळे बोवांस तेथे फार दिवस राहता आले नाही, 'पुन्हा परत येईन' असे अभिवचन देऊन तेथील प्रेमी मंडळीस निरोप दिला. सुजालपुरहून नरसिंगड १५ कोस असून तेथे जाण्यास बैलगाडीचा रस्ता होता. रा. विष्णुपंत तांबे, गोंदूभैय्या करकरे व बाबासाहेब बक्षी यासह बोवा बैलगाडीने नरसिंगडास पोहोचले.

गणपतराव तांबे, नरसिंगडास रा. काथवटे ज्या हवेलीत राहत असत तेथेच राहत होते. नरसिंगडास पोहोचल्यावर गाडीवाल्याने बोवांस मंडळीसह त्या हवेलीजवळ आणिले, ही हवेली चार मजल्याची होती. हवेलीच्या दारापाशी एक मोलकरीण होती. तिने बोवांची वर्दी गणपतरावांस पोहोचविली. गणपतरावांस वर्दी पोहोचतास अत्यंत आश्चर्य वाटले. साडेगावाहून इतक्या लांब मुद्दाम यावेळेस बोवा आपणास भेटण्यास येतील अशी गणपतरावांस कल्पनाही नव्हती. गुरुमहाराज आल्याची बातमी मोलकरणीने सांगताच गणपतराव ताबडतोब खाली आले व बोवांस पाहताच आनंदित होऊन प्रथम पायावर लोटांगण घातले. नंतर बोवांनी त्यास आशीर्वाद देऊन उठविले. गणपतरावांनी त्यांचे बरोबर आलेल्या सर्व मंडळीस नमस्कार करून सर्वांस ते वर घेऊन गेले, थोडावेळ इकडील तिकडील कुशलप्रश्न झाल्यावर बोवांनी गणपतरावांस

विचारले की, 'तुम्ही आमचे संबंधी सोलापुरच्या मामलेदारास तारा किती, काय व कशाकरिता केल्यात?' गणपतराव म्हणाले की, ''महाराज! आपले पत्र आल्यावर, येथील माझे स्नेही नाझीमसाहेब रा. काथवटे यांनी करमाळे येथील मामलेदार त्यांच्या ओळखीचा असल्यामुळे त्यास तारेने कळविले की, 'तेथील लोक बोवांस विनाकारण त्रास देत आहेत असे कळते. तरी ते त्रास न देतील अशी व्यवस्था करणे. बोवा सज्जन आहेत.' यापेक्षा जास्त आम्ही काही लिहिले नाही.'' हे ऐकल्यावर बोवांस सर्व कोडे उलगडले व मामलेदाराने कशी युक्ति करून लोकांस धाक दपटशा दाखवून आलेल्या संकटाचे निवारण केले वगैरे सर्व काही बोवांस कळले व काळजी दूर झाली. भक्तावर आलेले संकट प्रभू कसे परस्पर निरनिराळ्या प्रकारे टाळीत असतो हे पाहून त्यांस प्रभूची धन्यता वाटली. आपल्या करिता आपल्या शिष्यास मामलेदारसाहेबांकडून काहीही त्रास होऊ नये येवढ्याकरिताच केवळ खुलासा करण्यासाठी गुरुमाऊलीने येथे इतक्या लांब धाव घेऊन बहुत अडचणी सोसल्या, याबद्दल गणपतरावांस फार वाईट वाटले व बोवांच्या चरणांस त्यांनी घट्ट मिठी दिली. बोवांनी नंतर गणपतरावांचे समाधान केले.

थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर संध्याकाळी नाझिम साहेब (नागेशराव काथवटे) कचेरीतून आले. गणपतरावांनी बोवासाहेबांची व त्यांची ओळख करून दिली. नागेशरावांस मोठा आंनद झाला. दुसरे दिवशी सर्वांच्या आग्रहास्तव बोवांनी कथा केली. बोवांस हिन्दी भाषा चांगली अवगत नव्हती तरी त्यांनी ते दिवशी हिंदीत कथा केली. पाठीमागे कसलीही साथ नव्हती पण कथा उत्तम वठली गेली. नागेशराव, त्यांच्या पत्नी सौ. मथुराबाई उर्फ ताईसाहेब, गोविंदरावजी वैद्य (इंजिनिअर) व त्यांच्या पत्नी ठकूताई वगैरे मंडळी कथेस हजर होती. सर्व श्रोतृगणांस बोवांची कथा फारच गोड व रहस्यपूर्ण अशी वाटली. या पहिल्या भेटीतच बोवांनी सर्वांचे चित्त आपलेकडे आकर्षून घेतले. गणपतरावांनी बोवांविषयी जे वर्णन केले होते ते सर्व त्यास सत्य वाटू लागले. बोवांची साधी राहणी, बालका सारखा शुद्ध व सरळ स्वभाव, त्याचे अत्यंत निरभिमान व उदात्त अंत:करण इत्यादि पाहून सर्वांच्या अंत:करणावर इतका परिणाम झाला की, सर्वांनी बोवांस नरसिंगडी आणखी चार-पाच दिवस राहण्याचा आग्रह केला. परंतु बोवांस गावी परत लवकर जावयाचे असल्यामुळे पुन्हा लवकरच येण्याचे अभिवचन देऊन ते नरसिंगडाहून साडे गावी गेले.

■■■

# गोजिरवाणी... ✍

**- सौ. नीता कुलकर्णी**

**मुले** - आजी आज तू कोणती गोष्ट सांगणार आहेस?

**आजी** - आज मी एका राजाची गोष्ट सांगणार आहे.

**मुले** - सांग ना, आजी!

**आजी** - एका राज्यामध्ये अशी पद्धत होती की प्रत्येक वारसाला एक एक वर्षच राज्यासन मिळायचे. नंतर त्याला नदीमध्ये बुडविले जायचे व पुढील वंशज राजा व्हायचा!

**मुले** - बापरे, अशी कशी प्रथा?

**आजी** - अरे, अशीच रूढी तेथे चालत असे. त्याप्रमाणे येणारा राजा एकच वर्ष असलेल्या राज्यपदाचा उपभोग घेऊन अंती बुडविला जायचा. ते एक वर्ष त्याचे आयुष्यातील शेवटचेच वर्ष असायचे. अशीच काही वर्षे गेल्यावर एका राजाचे राज्य सुरू झाले. परंतु हा मात्र कुठलेच उपभोग घेत नसे.

**मुले** - असे कसे काय? त्याला मरणाची काळजी वाटत होती का?

**आजी** - अरे, सगळ्यांना असेच वाटले. परंतु हा राजा नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर महाल उभा करीत होता. तेथे त्याने ऐषारामाच्या सर्व सुविधा केल्या. तसेच पाण्याखाली जिवंत राहण्यासाठी श्वासाचे धडे व पोहण्यातील नैपुण्य तो साधत होता.

**मुले** - ते कशासाठी?

**आजी** - अरे, त्याला एक वर्षाच्या सुखाची चिंता नव्हती, तर पुढील आयुष्यात जिवंत राहून उपभोग घ्यायचे होते.

**मुले** - मग पुढे काय झाले?

**आजी** - अरे, होता होता एक वर्ष संपले. पण इतर राजांप्रमाणे हा मृत्यूमुखी पडला नाही तर त्याने गुप्ततेने नदीचा दुसरा किनारा गाठला. आतापर्यंत तो पट्टीचा पोहणारा तर झालाच होता. पुढे उर्वरित आयुष्य त्याने सुखासमाधाने ऐषारामात घालविले. पण हे सर्व त्याने वर्षभर केलेल्या अविरत मेहनतीमुळे व पूर्व नियोजनामुळेच शक्य झाले. मुलांनो, तुम्हास यातून काय समजले?

**मुले** - भविष्यातील सुखाचा विचार करून वर्तमानात जगले पाहिजे.

**आजी** - अरे, नुसतेच जगायचे नाही. त्यासाठी परिश्रमही करावे लागतात. तसेच

तात्पुरत्या सुखाचा विचार न करता शाश्वत सुखाचा विचार करावा. हेच तर गुरुमाऊली आपल्याला सांगत असते.

## गुंजारव - १

**- सौ. प्रतिभा गोखले**

माधुरी गुण गाऊँगी। मै प्रभू गुण गाऊँगी।।धृ.।।
हृदय मंदिर में माधुरी पूजा। प्रेमकी ज्योत लगाऊँगी।।१।।
ज्ञानगंगा जलसे चरण धोऊँगी। शांति पितांबर पहनाऊँगी।।२।।
कायाका चंदन विवेक तिलक। वैराग बुक्का लगाऊँगी।।३।।
सुमन पुष्प तुलसी भावभक्ति मिठाई। शुद्ध सत्व दूध पिलाऊँगी।।४।।
अहंकार धूप अहम् सोहम् बाती। अनाहत घंटी बजाऊँगी।।५।।
ऐसी पूजा रहे ना प्रतिभा। माधुरी में घुलमिल जाऊँगी।।६।।

## गुंजारव - २

**- अपर्णा**

श्रावणात कोसळतात सरीवर सरी।
शुद्ध चतुर्दशीला जन्म गुरुदेवांचा नंदनभुवन दारी।।
गुरुदेव म्हणून लाभले तोही उत्सव वाढदिवस तिथीचा।।
नवा जन्म झाला अपर्णातल्या सच्चिदानंदाचा।।
वासरास भूक असताना गाय जशी भेटली।
बोधरूपी ज्ञानामृत पाजून माऊली ही भेटली।।
स्थूळाहूनी वेगळा, तू सूक्ष्मालाही दूर सार।
कारण महाकारणापलिकडले स्वरूप दिले बोधातून हे सार।।
विषयांनी उठलेले काहूर शांतपणे दमविले।
तू सर्वाहूनी निराळा वेळोवेळी सांगितले।।
मोहामध्ये अडकते मन आता विवेकाने प्रसंगा सावरी।
आठवावे हेच शब्द क्षणोक्षणी **ॐ माधुरी नमो माधुरी**।।
स्वतः जाणे दुसऱ्यासही जाणे दाखविले रूप चैतन्याचे।
'मी' हा किती व्यापक सारा पटविले त्याही पलिकडचे।।
वाढदिवसाच्या सोहळी सर्वजण आले रंगात।
अपर्णालाही विरून जाऊ देत माधुरीनाथांच्या प्रेमात।।

# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार... ✍

## सदाचार

२४) विष्णु चिन्मात्र एकरस। प्रत्यगात्मा ब्रह्म अविनाश।

ऐशिया तुझ्या ठायी भ्रमविलास। रज्जुसर्पापरी झाला।।२४।।

**अर्थ** - विष्णु ज्ञानस्वरूप असून सगळीकडे सारखा व्यापलेला आहे. तसेच तो अविनाशी आहे. परंतु भ्रांतीमुळे दोरीवरील सर्पाप्रमाणे त्याच्याठायी जगताचा भास होतो.

**भावार्थ** - विष्णु ज्ञानस्वरूप आहे व एकरस आहे, म्हणजेच सगळीकडे व्यापलेला आहे. म्हणून त्यास विष्णु असे म्हणतात. तसेच तो अविनाशी आहे. परंतु भ्रांतीमुळे त्याच्या ठायी जगताचा विलास दिसतो. जसे अंधारामध्ये दोरी सर्पाप्रमाणे भासते. त्या सर्पाचा नाश जेव्हा दोरीची जाणीव होते तेव्हा होतो. तसेच जगत्‌विलास जो भ्रांतीमुळे निर्माण होतो, तो आत्मजाणिवेनेच नाहीसा होतो.

२५) जीवेश वाच्य बोले न्याय। सांख्ययोगे लक्ष्य प्रत्यय।

वेदांत ऐक्यत्व निश्चय। जाणती ज्ञाने।।२५।।

**अर्थ** - न्याय शास्त्राने जीव व ईश यांचे ज्ञान होते. सांख्ययोगाने आत्म्याचे ज्ञान होते. वेदांताने दोन्हीच्या ऐक्यत्वाचा निश्चय होतो हे ज्ञाते जाणतात.

**भावार्थ** - न्यायशास्त्र हे जीव व ईश यांचे ज्ञान देते. सांख्ययोगाने लक्ष्यार्थाचे ज्ञान म्हणजेच आत्म्याचे ज्ञान होते. परंतु या दोन्हीचे ऐक्यत्व मात्र वेदांतानेच होते. नित्याच्या जाणीवा ('मी' व 'माझे') या बाजुला ठेवल्यावरच ऐक्यत्वाचा निश्चय होतो. याची जाणीव ज्ञान्याला असते.

२६) वाच्यांश कार्यकारणांचा। त्याग करून जीवेशांचा।

अत्याग एकरूपी लक्ष्याचा। चिदंश म्हणोनी।।२६।।

**अर्थ** - कार्य व कारण हे उपाधीमुळे होतात. जीव व ईश या उपाध्यांचा त्याग

केल्यावर ब्रह्मरूप होता येते व चिद् लक्षणाचा अनुभव घेता येतो (चिदंश असल्याने)

**भावार्थ -** जीवाच्या ठिकाणी अज्ञानामुळे स्थुळ, सूक्ष्म व कारण हे तिन्ही देह उभे राहतात. तसेच ज्ञान झाल्यावर ज्ञानाचा अहंकार निर्माण होऊ शकतो. तेव्हा जीव व ईश या दोन्ही उपाध्यांचा त्याग केल्याशिवाय ब्रह्मरूप होता येत नाही. चिद् लक्षणाचा तेथे अनुभव घेण्यासाठी उपाधींना बाजुला करावे लागते.


२७) कर्मशास्त्री कैचे ज्ञान। तर्के निश्चय नव्हे जाण।
सांख्ययोगासी भेद भान। व्याकरण शब्दी तत्पर।।२७।।

**अर्थ -** कर्म शास्त्रात ज्ञान नाही. तर्कशास्त्रातही ज्ञानाचा निश्चय होत नाही. सांख्य व योग शास्त्रानेही भेद निर्माण होतो. व्याकरण शास्त्र हेही शाब्दिकच आहे.

**भावार्थ -** कर्मशास्त्रात अनेक कर्मे सांगितली जातात. परंतु त्यामुळे ज्ञानप्राप्ती होत नाही. तर्कशास्त्रातही नाना तर्क, दृष्टांत व युक्त्या असूनही आत्मज्ञानाचा निश्चय होत नाही. सांख्यशास्त्र व योगशास्त्रातही अभेद ज्ञान न होता भेदच शिल्लक राहतो, तर व्याकरण शास्त्र हेही शाब्दिकच असून तेथेही सार परमात्मा सापडत नाही.

## रुचि रुचि भोजन

ज्ञानाग्नीत तीळ भाजला। मायाजाळापासून वेगळा केला।।
प्रेमपाकात शिजविला। विवेक वैराग्याने घोटियला।।
भक्ति वेलचीने सुगंधित केला। गुळगुळीत गोल वळिला।।
अंतर्बाह्य गोड झाला। गुरुप्रेमाने ओथंबला।।
असा तीळगुळ वाटला। नीतास माधुरीरूपाने गावला।।



# अशी सखी

– सौ. प्रतिभा गोखले

सोमवार २१ ऑक्टोबरचा दिवस. नेहमीप्रमाणे सौ. सुरेखा आणि मी सौ. शामलाला भेटायला चाललो होतो. सौ. फडेवहिनी परस्पर येणार होत्या. नेहरू मैदान क्रॉस केले आणि फोन वाजला. कानावर जे शब्द पडले त्यावर विश्वासच बसेना. आम्ही दोघीही सुन्नच झालो. कारण बातमी होती सौ. शामलाने देह ठेवल्याची!

एका मैत्रीणीच्या नवजात नातवाला पहायला हॉस्पिटलमध्ये जाऊन बाहेर पडलो आणि ही बातमी ऐकली. खरंच, काय योग म्हणावा? एकीकडे जन्माच्या आनंदात सहभागी होऊन बाहेर पडताना कल्पनाही नव्हती की, लगेचच मृत्यूचे दुःख पचवायचे आहे.

पण वस्तुस्थिती कोणीही बदलू शकत नाही. एकीकडे ती देहाने राहिली नाही म्हणून दुःख मानावं की जन्ममरणाचा फेरा तोडून ब्रह्मलीन झाल्याचं समाधान मानावं अशी द्विधा मनःस्थिती झाली. आज जर विचारलं की, ''कशी होती तुझी सखी?'' तर एवढंच सांगेन की,

**साधी रहाणी, शुद्ध विचारसरणी।**

**परखड वाणी, चित्त सदा सद्‌गुरूचरणी।।** हीच तिची यथार्थ ओळख!

बोधाच्या आधी दोन-तीन वेळा आपटे आजींकडे जाण्याचा योग आला. तेव्हा आपटेवहिनींशी ओळख झाली. पुढे बोधानंतर एकमेकींकडे जाणे येणे वाढले, मैत्र जुळले आणि 'आपटेवहिनींची' शामला कधी झाली कळलंच नाही!

मी त्यावेळी व्ही.टी. ला ऑफिसमध्ये जात होते आणि शामला घाटकोपरला! ती लेडीज स्पेशल गाडीने जायची म्हणून मीही त्या गाडीने जायला लागले. हळूहळू कल्पना, सुरेखा, उषा, देशपांडे बाई, संगीता इ. गुरुभगिनी सामिल झाल्या. गाडीत नित्यावली वाचन, भजन इ. सुरू झाले. आमच्या शेजारी काही साऊथ इंडियन बायका/मुलींचा ग्रुप बसायचा. आमचं वाचन इ. त्यांना आवडायचं नाही. म्हणून त्या कुरकुर करायला लागल्या. मी म्हटलं शामलाला की, 'आपण दुसरीकडे बसू, उगीच कटकट नको!' पण ती म्हणाली,'कशाला? गाडी काही त्यांचीच नाहीये. आपण तिथेच बसायचं आणि आपलं रूटीन चालू ठेवायचं.' मग ठरवलं की दर दोन-तीन दिवसांनी काही तरी प्रसाद आणायचा आणि त्या ग्रुपमध्येही वाटायचा. त्या प्रसादाची

किमया अशी झाली की, त्यांचा विरोध तर हळूहळू मावळलाच, शिवाय यदुने आमच्याकडून इंग्रजीमध्ये 'हृदयाच्या आकाशी' हे भजन लिहून घेतले. नंतर तिने बोधही घेतला आणि ती आमची गुरूभगिनी झाली. शामलाच्या ठाम निर्णयामुळेच इतका बदल झाला आणि बाकीच्या इतर जणी आमच्या मैत्रिणी झाल्या.

आमची मैत्री झाल्यावर तिला पूर्वी गुरुदेवांनी जसा गुरूगीतेचा अर्थ सांगितला होता तसाच तो तिने मला सांगितला. साधनेच्या दृष्टीने जे जे काही गुरुदेवांनी शिकवले किंवा आपटे आजींचे पाहिले ते ते हातचं न राखून ठेवता शिकवले. ज्या उत्सवाला आपण जाऊ शकत नाही त्या वेळी रोज त्या त्या गुरुदेवांचा नामाच्या १० माळा करायच्या हे सांगितले. नंतर आम्ही दोघींनी त्या काळात एखादं पद, कधी अष्टक, जनक-याज्ञवल्क्य संवाद, सदावर्तातील दशहाराचे पद, बुद्धीबोध इ. वेळोवेळी उत्सवात पाठ करण्याचा प्रयत्न सुरू केला. तिच्यामुळेच ही सवय लागली आणि दोघींचं बरंच पाठांतर झालं ही गुरुकृपा!

काळे वाड्यात मंदिर चालू झाल्यानंतर उत्सवाच्या वेळी गुरुदेव येणार असतील तेव्हा मंदिराची साफसफाई, सजावट, उत्सवाची इतर तयारी, बोलावणी इ. गोष्टी दोघी मिळून होऊ लागल्या.

'पाझर' मासिक सुरू झाल्यानंतर त्याचं प्रूफ रिडींगचं काम आम्ही करू लागलो. प्रूफ लवकरात लवकर तपासून द्यायचं असायचं, त्यामुळे कॉपी मिळाली की लगेचच ते काम करत असू. एकदा माझ्या सासूबाई हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असताना पाझरचं काम करण्याची वेळ आली. मी हॉस्पिटलमध्येच दुपारच्यावेळी असायची. तेव्हा शामला म्हणाली की, 'चल, आपण इथेच बसून वाचन करू' आणि शेजारच्या रिकाम्या वॉर्डमध्ये बसून आम्ही ते काम केलं. अशी तिची गुरुसेवेची तत्परता!

बोलणं परखड असलं तरी मनात कधीच मत्सर, असूया, आकस, मोह इ. नसायचा. आतून सर्वांवर प्रेम असायचं. तिच्या घरी मंदिर सुरू झाल्यावर वाचन, भजन इ. संपले की, सर्वांना चहा करायची. कधी कधी चहा नको म्हणून बाकीच्या घरी गेल्या तरी मला मात्र चहा पिऊनच जाण्याचा तिचा आग्रह असायचा. घरात काहीही वेगळा पदार्थ केला की, माझ्या साठी राखून ठेवलेला असायचा. माझ्या कोणत्याही अडचणीत ती माझ्यामागे ठामपणे उभी रहायची आणि धीर द्यायची. मला बहीण नाही. पण तिच्या रूपाने गुरुदेवांनी ती उणीव भरून काढली. तिने प्रेम खूप केलं माझ्यावर!

प्रसंगी रागावली सुद्धा! पण या मोठ्या बहिणीचा प्रेमाचा हात कायम पाठीवर राहिला. तिचं माझं नातं असं अतूट झालं की कित्येकदा लोक विचारायचे की तुम्ही बहिणी आहात का? अगदी शेवटी हॉस्पिटलमध्ये असतानाही तिथल्या सिस्टरने हाच प्रश्न विचारला तेव्हा मजाच वाटली.

एखाद्या दिवशी जप झाला नाही तर दुसऱ्या दिवशी दुप्पट करायचा असा तिचा दंडक होता. कधी कधी मंदिराच्या वारी कोणीच गेलं नाही तरी ती संध्या. ४ ते ६ वाचन, भजन करायची. अशी साधन तत्परता होती. मंदिराच्या वाराव्यतिरिक्त इतर दिवशी तिच्याकडे जाण्याची वेळ आली तर जे काही काम असेल ते संपल्यावर थोडं तरी वाचन व्हायचंच. आपल्या परीने ज्याला ज्याला मदत करता येईल त्याला ती करायचीच. घरातल्या कामवालीला बऱ्याच वेळा जेवणखाण द्यायची. कुणाकुणाला आर्थिक मदतही करायची.

गुरुदेवांवर इतकी निष्ठा आणि प्रेम होतं की, गुरुदेव डोंबिवलीला येणार म्हटल्यावर, त्या येईपर्यंत तिला त्यांचेच वेध असायचे. इतर काही सुचायचं नाही आणि त्यांचं दर्शन झालं की जो काही आनंद ओसंडायचा तो आपण सर्वांनीच अनुभवला आहे. खरोखरीच गुरुदेव तिच्यासाठी माता, बहीण, मैत्रिण सर्वकाही होत्या हे मी खूप अनुभवलं आहे.

शेवटी ऑपरेशनच्या आदल्या दिवशी गुरुदेव हॉस्पिटलमध्ये आल्या असताना गुरुदेवांना तिने यातून सोडविण्याची विनंति केली. इतकेच नाही तर त्या लगेचच यूएसएला जाणार असल्यामुळे त्यांना **हॅप्पी जर्नी** म्हणून सांगितले. त्या दिवसापासूनच बहुधा तिने आपलं जगणं नाकारायला सुरुवात केली. कारण त्यानंतर ज्या ज्या वेळी तिला भेटून घरी निघायची त्या त्यावेळी ती मला जणू ही अखेरचीच भेट असल्यासारखा नमस्कार करायची. पोटात इतकं गलबलायचं की, शेवटी मी तिला तसा नमस्कार करू नको म्हणून विनंती केली. पण तिने ते सोडलं नाही.

अशी आपल्या सर्वांची शामला गुरुपदी विलीन झाली. इतर गुरुबंधू-भगिनी आहेत, आणखीही त्यात भर पडेल पण ''शामला'' पुन्हा मिळणार नाही.

आठवणींच्या गाभाऱ्यात एक कोपरा तिचाच आहे आणि असेल!

शामला, तुला अनेकानेक प्रणाम।

# मधला गुरू

**- सौ. सुरेखा जोशी**

आमची शामला म्हणजे नावाप्रमाणेच शामल वर्णाची, सडसडीत बांध्याची, हसतमुख, एक शेपटा घातलेली, थोडीशी कडक शिस्तीची, फणसासारखी आतून गोड असलेली आमची गुरुभगिनी! खूप जवळची सखी आणि मोठ्या बहिणीप्रमाणे प्रेम करणारी आमची ताईच! नोकरीच्या निमित्ताने 'महिला स्पेशल' गाडीत ओळख झालेली, माझी सखी!

गुरू म्हणजे काय हे काहीच माहीत नसलेल्या अज्ञानी सुरेखाला रोज गाडीत सगुण गुरूभक्तीचे महत्त्व, प्रारब्धाने मिळालेला मनुष्य देह कसा महत्त्वाचा आहे व गुरू अनुग्रह मिळणे किती भाग्याचे आहे वगैरे गुरुभक्तीचे धडे मिळू लागले. रोज नित्यावली वाचन, भजन, भजनांना चाली लावणे वगैरे गोष्टीत तिच्याबरोबर ती मलाही घेऊ लागली आणि अशी गोडी लावत लावत एक दिवस गुरुमाऊलींची भेट पण घडवून दिली. तिच्याचमुळे सुरेखाला सद्‌गुरु माऊली मिळाली. सुरेखाला अनुग्रह मिळाल्यावर सुरेखा इतकाच अवर्णनीय आनंद शामलालाही झाला आणि आमचा अभ्यास सुरू झाला. दर गुरूवारी, शनिवारी आपुलकीने स्वागत करायची, 'तू ऑफिसमधून आलीस ना, आधी चहा घे, फ्रेश हो, मग आपण वाचन करूया.' नित्यावलीतल्या अष्टकांचा अर्थ सांगण्यापासून अभ्यास सुरू झाला. बोरिवलीला उत्सवात जाणे जमले नाही की तिथून आल्यावर गुरू माऊलींनी काय काय सांगितले हे सर्व केव्हा एकदा आम्हाला सांगू असे तिला व्हायचे. तिच्या मुखातून गुरू माऊलींचे सारे निरूपण आम्हाला मिळायचे. आपल्या या जन्मात लहानपणापासून आपल्याला अनेक गुरू लाभलेले असतात. तशीच शामलाताईच्या रूपाने मला प्रपंचात, व्यवहारात कसे वागावे तसेच गुरु माऊलींची सेवा कशी करायची, वगैरे बाबतीत ज्ञान देणारी एक गुरूच लाभली. असाच आमचा हसत खेळत, आनंदात अभ्यास चालू असताना अचानक माझी ताई आजारी झाली. रोज तिला दवाखान्यात जाऊन भेटण्याशिवाय काही सुचतच नव्हतं. घरी आणल्यावर पण तिच्याजवळ बसून अभिषेक म्हणायचा,

पान नं. २० वर

# लाडक्या ताई

**- गीता फाटक**

सौ. शामला श्रीधर आपटे यांची व गीताची भेट डोंबिवली येथे ६ डिसेंबर १९९५ला श्रीसस माधुरीनाथ बल्लाळ यांचे घरी झाली. तो दिवस गीताच्या आयुष्यातील भाग्याचा दिवस होता. कारण याच दिवशी गीताला परंपरेनुसार बोध मिळाला होता. शामलाताईंना पहाता क्षणीच मला त्या खूपच जवळच्या, वडील बहिणीसारख्या वाटल्या व अंतर्यामी प्रेमच वाटत राहिले. त्यांनीही शेवटपर्यंत सर्वच गुरु बंधुभगिनींना प्रेमच दिले. बुद्धीबोधानुसार

प्रेमाने बोलणे, प्रेमाने चालणे, प्रेमाने उठणे, प्रेमाने बसणे,
जगचि पाहता प्रेममय असणे, निजभक्ती वर्म सप्रेम असणे

या श्लोकाप्रमाणे शामला ताई वागत होत्या. गुरुगृही आलेल्या सर्वांना काहीना काही श्रवण झालेच पाहिजे हा त्यांचा अट्टाहास असे. त्याचबरोबर घरी आलेल्यास चहा व प्रसाद म्हणून काही तरी देणारच. आपल्या बोलण्यातून त्या सगुण सद्‌गुरुभक्तीची श्रेष्ठता नेहमी सांगत. गीता नेहमी येत नाही म्हणून आवर्जून फोन करून बोरिवली यात्रेत सहभागी करून घेत. आपण वारंवार गुरुमुखातून श्रवण केले पाहिजे, जमेल तेव्हा संधी सोडू नये असेच त्या आम्हा गुरु भगिनींना सांगत. त्यांना कीर्तन भक्ती फारच आवडत होती. कोणी असो वा नसो प्रतिभासह त्या दर एकादशीस व नैमित्तीक कीर्तन सेवा गुरु आज्ञेने करत ‘अगं गीता, कथा केल्याने आपला अभ्यास होतो’, असे सांगणाऱ्या आमच्या शामला ताई आज देहाने नसल्या तरी त्या सदैव आमच्या बरोबरच आहेत. प्रत्येक व्यक्तीस त्या नकळत नमस्कार करीत. गुरुरूप त्यांच्या दृष्टीत पुरेपुर भरले होते. गुरुमय रूपाची गोडी त्यांना होती. प्रातःकालापासून रात्री झोपेपर्यंत त्यांची साधना चालू असायची. श्रीयुत श्रीधर आपटे यांचेसह वाचन, चर्चा होत असे. भावलेल्या चांगल्या वाचनाचा, विचारांचा प्रसाद त्या आम्हाला देत होत्या. ईश्वरी सत्तेत देहाच्या प्रपंचातील त्यांना विशेष जबाबदारी राहिली नव्हती. मुले मोठी असल्याने पूर्णवेळ त्या वाचन, लेखन यातच असत. प्रापंचीक गोष्टी बोललेल्या त्यांना आवडत नसे. सर्वांना मदतीसाठी तत्पर असत. पैशाने, कष्टाने

पान नं. १८ वर

# गोड शेवट

**- दीपक फडे**

त्या दिवशी मी अहमदाबादला होतो. काही कारणास्तव रश्मीशी बोलणं झालं. तिने सांगितलं की आपल्या गुरुभगिनी शामला आपटे यांनी देह ठेवला. ऐकून सुन्न झालो. अरे कालच तर आपण त्यांना भेटून आलो. डोळ्यात पाणी तरळलं आणि त्यांच्या आठवणी जाग्या झाल्या.

गुरुभगिनी शामला म्हणजे खरचं डोंबिवलीतलं एक सळसळतं चैतन्य होतं, ते फक्त शांत झालं. देह पंचमहाभूतात मिसळला, परंतु त्यांच्या आठवणी तशाच आहेत.

पूर्वी त्या जुन्या घरात असताना त्यांच्याशी फारसा संपर्क नव्हता. त्या कशा होत्या फक्त ऐकीवच...परंतु महाराजांनी जी शामला घडवली ती वेगळीच होती.

पेंडसेनगर मध्ये त्या राहण्यासाठी आल्या आणि त्यांच्या घरी येणं जाणं वाढलं. काही तरी निमित्त होत असे आणि आमचा संपर्क वाढला. प्रत्येक वेळेस तोंडात एकच 'आपला शेवट गोड व्हायला हवा ना... मग साधना ही केलीच पाहीजे.' कथा दीपकला करायची असली की, ती मंदिरात असो वा डोंबिवलीला त्यांना विचारावं आणि त्यांनी अगदी प्रेमाने ती कशी करायची ते सांगावं, 'अरे, कथा करणारा कोण? महाराज करवून घेतील की,' म्हणावं, 'अरे, आपल्यापेक्षा महाराजांनाच जास्त काळजी असते' आणि मग सारं अगदी सुरळीत पार पडत असे...

महाराज डोंबिवलीत कुणाकडे ही येणार असो, त्यांची आठ दिवस आधीपासून धावपळ, तसेच फोनाफोनी सुरु असे... मला आठवतं अगदी पहिल्यांदा महाराज दीपककडे येणार होते. त्यांच्या सूचना असायच्या, 'अरे, आपले महाराज ना... मग आपणच त्याचं कौतुक करायचं... स्वागत असं करायचं...' आणि तयारीसाठी त्या सकाळपासूनच घरी असायच्या आणि शामला आली की आईला आणि मलाही खूप मोठा आधार वाटायचा!

वाटायचं महाराजांचं आपण काही करताना चुकणार तर नाही ना? त्यांचे शब्द तेच, 'अरे, काही चुकलं तरी महाराज सांभाळतील ना...' त्यांनी सांगावं, 'अरे महाराजांचा राग म्हणजे राग नसतो फक्त अविर्भाव असतो. आई मुलावर कधी रागवली तरी ते रागावणं नसतं. बोलली तरी ते असतं आपल्या वागणुकीत सुधारणा होण्यासाठीच ना...'

आपल्या मुलाला समजवावं तसं मला नेहमी समजावत असत. घरी उत्सव असताना अगदी महाराज गोराईला जाईपर्यंत त्यांचा पाय घरातून निघत नसे. त्यांचा हा वावर ही आम्हाला हवाहवासा वाटायचा.

त्यांच्या बोलण्यात सडेतोडपणा होता. व्यक्ती जरी दुखावली, तरी त्यांचा उद्देश मात्र तसा नसे. तर समोरील व्यक्तीनेसुद्धा वागण्यात सुधारणा करावी हा त्या मागच्या हेतू! सर्व गोष्टी अगदी काटेकोर व्हायला हव्या, असा त्यांचा अट्टाहास असे.

त्यांच्या आवाजात एक वेगळच माधुर्य होतं. त्यांनी म्हटलेली गाणी, भजनं, आरत्या अजूनही आठवतात.

त्यांच्या घरी गेलं की आमच्या पारमार्थिक चर्चा व्हायच्या. महाराजांनी कथेत आणि पोथीत काय वेगळं सांगितलं ते त्या सांगत असत. आमचा संवाद म्हणजे फक्त महाराज आणि महाराज! या शिवाय दुसरं काहीच नसे. त्यांच्याकडे माझा एक तास कसा संपत असे मलाच कळत नसे. त्यांची महाराजांबद्दलची ओढ ही अबाधित होती. वयाने कितीही मोठ्या असल्या तरी आमच्या गप्पा अगदी खेळीमेळीच्या व्हायच्या. 'अरे, आता फक्त पटकन कॉफी करते... घे आणि जा' बोलणं असं असे की नकार द्यावयास जागा नसायची. घरी गेल्यावर त्यांना होणारा आनंद अगदी लपत नसे. खरचं एक दुर्लभ व्यक्तिमत्त्व होतं...

अगदी शेवटच्या दिवसातली ही आठवण. घरची पूजा आणि अभिषेक आटपून मनात आलं शामला मावशीला आता घरी आणलं आहे तर निवांत भेटून यावं, बाटलीत महाराजांच्या पादुकांचे तीर्थ घेऊन त्यांच्या घरी पोहोचलो. आजारी असल्या तरी त्या तेवढ्याच शांत होत्या. मला बघितलं आणि बोलणं सुरु झालं. मात्र मी हातानेच खुणावलं. आमचा शब्दाविना संवाद झाला. सांगितलं, 'संध्याकाळी कामावर जाणार आहे,' वगैरे... म्हटलं, 'हे तीर्थ तुमच्यासाठी!...' त्यांचा तीर्थावर खूप विश्वास होता, अभिषेकाच्या तीर्थाची बाटली समोर ठेवली आणि काकांना नमस्कार करून जड पावलांनी घरी आलो आणि ती आमची शेवटची भेट ठरली. नियतीनं काही वेगळचं ठरवलं होतं. पण अखेर शेवट त्यांच्या म्हणण्या प्रमाणेच गोड झाला... कारण शेवटपर्यंत महाराजांच नाव मुखात होतं आणि तीर्थ जवळ...

# माझी मैत्रिण शामला आजी

**- आरोही कुलकर्णी**

शामला आजीशी या नृसिंह जयंतीत मैत्री झाली. आधी वाटले कि आजी आणि एका मुलीमध्ये मैत्रीचे निमित्त काय? पण मग मैत्रीचे निमित्त मिळाले 'गुरूदेव'! मग 'आपले गुरुदेव' या विषयावर बोलणे सुरू व्हायचे. Good Behaviour चा Session असला की पुस्तक शेअर करणे, त्यांचे अनुभव व माझ्या अल्प अनुभवांची देवाण घेवाण व्हायची. दोघींचा एक अनुभव सारखा होता. तो म्हणजे Operation झाले होते तेव्हा गुरुदेवांच्या शब्दांनी दोघींना धैर्य मिळाले. LHS=RHS सिद्ध झाल्यावर जसा आनंद तसा शामलाआजीचे अनुभव = आरोहीचे अल्प अनुभव याचा खूप म्हणजे खूप आनंद झाला. अजून मैत्रीचे अनुभव म्हणजे एकमेकींना मदत करायची, नाटकांबद्दल बोलायचं! अशी आमच्या मैत्रीची सुरुवात झाली. त्या मला गुरुदेवांच्या एक Sincere student वाटायच्या. त्यांचा तो अनुभव व खाऊ वाटण्याचा स्वभाव खूप आवडायचा. त्यांनी दाखवलं की मैत्रीला वयाचे बंधन नाही!

---

पान नं. १५ वरून

सर्व मदतीस त्या तयार असत. त्यांनी प्रामाणिकपणे नोकरी करून कौटुंबिक जबाबदारी पार पाडली. ज्यांच्या जीभेवर गुरुवर्णनाशिवाय दुसरे काही नव्हते अशा आमच्या गुरुभगिनी शामला ताईंच्या आठवणींना सविनय सादर प्रणाम! चिरस्मरणीय शामलाताईंनी सोमवार दि. २१ ऑक्टोंबर सायंकाळी ५च्या सुमारास डोंबिवली येथे राहते घरी देह ठेवला. त्यांच्या संपूर्ण आजारपणात त्या कधीही खचल्या नाहीत. शांतपणे सर्व सहन करीत होत्या. त्यांच्यातील तितिक्षा गुणच महाराजांनी आम्हाला दाखविला.

अशा या शामलाताईंच्या स्मृतीस सादर प्रणाम!

# शामला नव्हे मारो शामळो

**- लता मोघे**

गुरुभक्त शामलाताई आपटे नावाबरोबरच डोळ्यासमोर उभी राहते ती लांबसडक केस असलेली, एक शेपटा घातलेली, सडसडीत बांध्याची, सहज इथून तिथून नाचणारी, सावळ्या रंगाची ताईच! कारण बोधानंतरच त्यांची खरी ओळख झाली. सद्‌गुरुंसाठी काय काय करायचं आणि कसं करायचं? हे तिनेच शिकवलं!

सद्‌गुरु घरी आले की त्याचं स्वागत कसं करावं? आणि कोकणस्थी बाण्याने चटकन् आवरून कसं घ्यावं हे तिच्याकडेच पाहायला मिळाले. आपटे आजींनी सांगितल्याप्रमाणे ती सर्व काही करीत असे.

शामला म्हणजे एक वादळ! कामातही सुपर फास्ट आणि बोलण्यातही! इतकी भराभरा बोलायची की कळायचंच नाही हिला इतकं सुचतं कुठून? आणि सांगून संपलं की खुदकन् हसून द्यायची आणि म्हणायची ''माझं सांगून झालं, आता तुम्ही बोला!''

तिचा आवाज मोठा गोड होता, अगदी कसलेल्या गायिकेसारखा!

''इथेच आणि या बांधावर अशीच शामल वेळ। सख्या रे किती रंगला खेळ।।''

हे पद आणि अनेक दुसरी पदे तिनेच म्हणावीत. त्यातील आर्त भाव आणि पारमार्थिक अर्थ खोलवर जाऊन रुजायचा!

''आमुची माळीयाची जात'' हे पद तिने म्हटले की समोर फुलाचा, भाजीचा बगीचाच दिसू लागायचा.

जेव्हा जेव्हा शामलाताई गोराईच्या मंदिरात यायच्या तेव्हा तेव्हा गुरुमाऊली तिच्याकडून पदे म्हणवूनच घ्यायच्या. ''किती दिवसात तुझा आवाज ऐकला नाही गं!'' की पटकन् तिने सुरुवात करावी. कुणी आढेवेढे घेऊ लागले की म्हणायची, ''गुरुमाऊली सांगतायत ना, मग पटकन् जसं येईल तसं म्हणायचं! पुढच्यावेळी आणखी छान म्हणता येईल. नाही म्हणायचं नाही!''

''एकवार तरी नाम मुखी घ्या, या संताना करा प्रणाम।
निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम।।''

हे पद तिच्याकडून पहिल्यांदाच ऐकले आणि हृदयात जाऊन भिडले! काय सांगू आणि किती सांगू? काही कळत नाही.

''**सद्‌गुरू म्हणजे मूर्तिमंत शिवलिंग!**'' असे वेदेश्वरीत नमूद केले आहे आणि त्या शिवलिंगाची श्रद्धापूर्वक पूजा व सेवा करण्याची कला तिला पूर्णपणे आत्मसात झाली होती. म्हणूनच फक्त नरसिंह मेहताचा शामळा नाहीतर ती सर्वांचीच शामला!

---

पान नं. १४ वरून

भजन म्हणायचे, असे चालू असताना एक दिवस अचानक भेटण्यासाठी घराजवळ पोहोचले असतानाच आमच्या भेटीची चुकामुक झाली. शामलाताईंचा देह अनंतात विलिन झाला. स्वरूपात मिळून गेला, आणि एक प्रकारची कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली. सतत डोळे भरून यायचे. काही सुचेनासं झालं की सुरेखा वेड्यासारखी कधी रेश्माला, कधी अर्चनाला, कधी प्रतिभाला अशी फोन करत सुटायची. दु:खाला आवर घालायला हवा वगैरे सर्व समजत असून पण शामलाच्या आठवणींनी मन बैचेन व्हायचे आणि गुरुदेव कधी एकदा अमेरिकेतून येतील असे झाले होते. त्यांना भेटल्यावर त्यांच्या कुशीत शिरून खूप रडायचे होते पण ती तर सच्चिदानंद गुरू माऊलीच! माऊलीने सर्व आधीच ओळखून फक्त नजरेनेच कवटाळले.

''**प्रारब्धावरी स्वस्थ बसावे। सुख दु:ख येता सम रहावे।।**''

असं सांगून दु:खावर आवरण घातले. शामलाताईच्या आठवणी पदोपदी येतच राहणार. पण तिच्या शिकवणीनुसार गुरु माऊलीचा हात धरूनच पुढचा 'आनंदमय प्रवास' आता आपल्याला करायचा आहे. शामला अगदी सद्‌गुरुमय झाली होती. माऊलींशी एकरूप झाली होती. तशी सद्‌गुरूभक्ती आम्हा भक्तांकडून होऊ दे अशी गुरुमाऊलींच्या चरणाशी प्रार्थना!

**गुरु उदार माउली प्रशांत सौख्य साउली।**
**जया नरासि फावली तयासि सिद्धि गावली।।**

# मरावे परी कीर्तिरूपी उरावे

**- अदिती**

'कीर्तन म्हणजे काय? आम्हाला तर कथा, कीर्तन काहीच करता येत नाही', अदितीने हा प्रश्न एकदा गुरुदेवांना विचारला होता. त्यावर ''अगं, शामला करते नं तेच कीर्तन! त्यापेक्षा वेगळं काही करायला नको,'' असे त्यांनी सांगितले. म्हणजे शामलाताई नेहमी प्रत्येकासमोर जो गुरुमहिमा सतत सांगत असत, ते कीर्तनापेक्षा काही वेगळं नाही. बोधी असू देत किंवा अबोधी असू देत, त्यांचं म्हणणं आपल्या गुरुची थोरवी गायला लाज कसली? आम्ही गाणारच, ते नाही त्यांच्या उपास्य देवतांची स्तुति करीत? मग आपला जो जगद्व्यापक सद्गुरु असतो आणि पावलोपावली आम्हाला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देत असतो, त्याचं वर्णन करायला भीड का पडावी?

खरच असा भक्त विरळाच! रिक्षेवाल्याला सुद्धा 'सद्गुरुनाथ महाराज की जय' असे म्हणून वंदन करत असत. आम्हाला थोडं हसू यायचे. हा काय वेडेपणा! पण भगवंत खऱ्या भक्ताजवळ तिष्ठत उभा असतो, त्याच्या हाकेला साद द्यायला!

दृढनिश्चय, गुरुवरील श्रद्धा आणि विश्वास हे त्यांच्या कडूनच शिकावे. 'काही होणार नाही, महाराज आहेत ना!', हा विश्वास जवळ अंगी बाणलेला आणि त्यांच्या सहवासात येणाऱ्या इतरांनाही त्याची प्रचिती यायची.

डोंबिवलीला राहणाऱ्या प्रत्येकाला काही इतक्या सहजपणे बोरिवलीला वारंवार येणे जमत नाही. मग अशावेळी गुरुभक्त शामलाताईंसारख्या लोकांच्या मार्गदर्शनाने शांतता येते. प्रपंचात आणि अभ्यासात अडचणी या येतातच. परंतु अशा लोकांच्या सहवासाने आपली पण आठवण जागृत राहते.

पंचभूतांचा देह हा जाणारच आहे. पण **मरावे परी कीर्तिरूपी उरावे** हे शामलाताईंनी खरे करून दाखविले. अशावेळी भक्त देवाची चाकरी करतो का देव भक्ताची कळत नाही!

# शामला मावशी वक्तशीर शिस्तप्रिय

**- सौ. रेश्मा प्र. शिवरकर**

काही वेळा एखादी व्यक्ती आपल्याला पहिल्यांदाच भेटत असते. पण तिच्या भेटीनंतर असं वाटतं अरे, आपण तर फार आधीपासून एकमेकांना ओळखतो. मग त्या पहिल्या भेटीतच अवघडलेपण केव्हाच विरून जातं आणि एका नवीन नात्याची सुरुवात न राहता आधीपासूनच असलेले काहीतरी ऋणानुबंध प्रकाशमय झाल्यासारखे वाटतात. हे सगळं आहे आपल्या सगळ्यांच्या लाडक्या गुरुभगिनी शामला मावशी विषयीचं! नांत म्हणायचं झालं तर गुरुभगिनी आणि व्यवहारात संबोधताना सगळ्यात जवळची अशी मावशी असते तशी ही मावशी!

बोधानंतर गुरुमाऊलींच्या मुखातून निरूपण ऐकण्याआधी शामला मावशीची कथा सगळ्यात पहिल्यांदा ऐकली. त्यावेळी कथा, निरूपण, श्रवण हे शब्दसुद्धा फार दूरचे वाटायचे. कथा ऐकणारा सगळा श्रोतृवर्ग १३ ते २३ वर्षे वयोगटातला. जीवनातल्या, संसारातल्या कुठल्याही खडतर प्रसंगांचा स्पर्श न झालेला, फुलपाखरासारखा बागडणारा काळ! ह्या वयात अध्यात्माची आवड, गोडी लागणं हे अवघडच! कथा ऐकायची म्हणजे दोन-अडीच तास एकाच जागी बसायचं! किती बोऽरं! पण शामला मावशीच्या कथेने अशी काही जादू केली की आम्ही २ तास कथा भरपूर एन्जॉय केली. तिचा प्रत्येक शब्द इतका वजनदार, भारदस्त होता की, सगळे पौष्टिक, चौरस आहारासारखे भरपूर जेवलो. आम्ही आतूनच आनंदी झाल्यासारखं फुलून गेलो आणि तिने आम्हाला 'स्व' च्या आनंदाची गोडी चाखवली. ती आम्ही कधीच विसरू शकणार नाही.

खरं तर अनेक प्रसंगांनी डोक्यात अगदी गर्दी झाली आहे. कुठला प्रसंग लिहावा? कारण तिचे सगळेच गुण आम्हाला ग्रहणीय वाटतात. गोराईला रहायला आल्यावर दोन गुरुपौर्णिमा उत्सवाला ती रेश्माकडे रात्री झोपायला यायची. अतिशय वक्तशीरपणा, स्पष्टवक्तेपणा, परखड बोलणं, वागण्यात आचरणात काटेकोरपणा इ. व एक प्रकारची शिस्त त्यामुळे सहजच वचक आणि आदर निर्माण झाला. ह्या सगळ्या विशेषणांना जरी 'पणा' असला तरी ती पुरती गुरुमय होती. म्हणूनच रेश्माला व प्रशांतला

तिच्याविषयी एक आदरणीय ओढ होती. रोज रात्री मंदिरात नाटकवाचन असायचं. शरीर थकलेले असायचे, तरीही गुरुदेवांनी सांगितल्यामुळे, गुरुआज्ञा म्हणून ती नाटकवाचन करूनच घरी झोपायला यायची. गुरुआज्ञेचे सचोटीने ती पालन करायची. गुरुसेवा करायचीच अशी ठाम भूमिका असल्यामुळे शरीराला सोसेल, झेपेल अशीच सेवा तिने **मागून घेतली**. ती म्हणजे सकाळी पाच वाजता सगळ्यांना चहा करून द्यायचा. पावसाळ्याचे दिवस होते आणि पहाटेची वेळ. धो-धो पाऊस कोसळत असायचा. पण ती पहाटे चार वाजता उठायची. अजिबात कसलाही आवाज न करता स्वतःचं सगळं उरकून बरोबर पावणेपाचला मंदिरात जायला तयार. ''अगं मावशी, किती पाऊस पडतोय, मंदिरात जाईपर्यंत ओलिचिंब होशील. पाऊस थोडा थांबू दे, मग जा, '' इति मी. ''काही काळजी करू नकोस, मी आंघोळीनंतर तीच साडी नेसली आहे. प्लॅस्टिकच्या पिशवीत धुतलेले कपडे घेतलेले आहेत. मंदिरात गेल्यावर स्वच्छ कोरडे कपडे घालेन.'' झालं असं म्हणून ती छत्री उघडून निघालीच. संपूर्ण गुरुपौर्णिमा उत्सवात धो-धो पाऊस कोसळत होता, पण तिने एकही दिवस उशीर केला नाही. बरोबर पाचच्या ठोक्याला काय, १० मिनिटे आधीच ती मंदिरात सगळ्यांना जागं करायला हजर असायची. वय वर्षे ७२, गुरुदेवांविषयी नितांत श्रद्धा, गुरूवाक्यावर सचोटीनं वागणं! ह्या सगळ्या गोष्टीमुळे रेश्मा व प्रशांत दोघेही अवाक् झाले आणि नकळत आम्ही रोज रात्री तिची वाट पाहायचो. छान छान गोष्ट सांगणारी आजी जशी असते तशी तिची गोष्ट ऐकण्याकरीता आतूर असायचो. दिवसभर पोथी, कथा, टिपऱ्या, भजन व नाटक वाचन एवढे करून सुद्धा ती फ्रेश असायची. गुरुदेवांबद्दलचे सांगणे, अनुभव, आठवणी इत्यादीबद्दल सांगताना ती इतकी भरभरून बोलायची की तो प्रसंग, आठवण, स्थळ आपल्या डोळ्यासमोर जिवंत उभी करायची. आपल्याबाबतीतच घडले आहे असेच वाटायचे, आम्हाला त्यात सामावून घ्यायची. घटना सांगत असताना किंवा अनुभव सांगताना तिच्याकडून नकळत झालेल्या चुकांबद्दल सांगायची आणि त्यातून काहीतरी नवीन शिकायला मिळायचे. सांगताना, 'मी जरा जास्तच बोलते ना' हे बोलायला ती कधीच विसरायची नाही.

पान नं. २५ वर

# माझी आजी... ✍

**- सोहम जोशी**

माझी आजी म्हणजे माझ्या आईची आई. माझ्या आजीचे नाव होते सौ. शामला श्रीधर आपटे. माझी आजी डोंबिवलीला पेंडसेनगरमध्ये रहात होती. मला ती खूप आवडायची. ती माझे खूप जास्त लाड करीत असे. तसे ती सर्वांचेच लाड करायची. मी जेव्हा तिच्या घरी जाई तेव्हा ती नेहमी माझ्यासाठी मला आवडणारा खाऊ आणायची. तिला माहित होतं की मला आम्रखंड, आंबे, आंब्याच्या वड्या अशा गोड पदार्थांची खूप आवड आहे म्हणून मी तिच्या घरी गेलो की ती माझ्या आवडीचे पदार्थ आणून ठेवी.

माझी आजी फक्त माझच भलं नाही बघायची तर सर्वांचच भलं चिंतायची. ती बाहेर गावी फिरायला गेली तर सर्वांसाठी काही ना काही आठवणीने वस्तू आणत असे. अशी माझी आजी वृत्तीने खूपच दिलदार होती. आपण दुसऱ्याला दिल्याने आपलं कमी न होता वाढतच जाते यावर तिचा विश्वास होता.

ती देवाचं भरपूर करणारी होती व तिचा देवावर विश्वास होता. म्हणूनच तिच्या आजारपणात तिने जमेल तेवढं देवाचं नाव घेऊन आपला वेळ घालवला.

तिचा स्वभाव खूपच बोलका होता. ती सर्वांशी बोलून मन मोकळे करत असे. तिला भजन, कीर्तनाची भरपूर आवड होती. म्हणूनच ती सप्ताहाला खूप वेळा बोरीवलीला जात असे. तिच्या मनात काहीही राहत नसे. त्यामुळे तिला वाटणारी काळजी तिच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत असे. आम्ही चांगला अभ्यास करून मोठे व्हावे, आईवडिलांसारखे नाव कमवावे असे तिला सारखे वाटे. सर्वांना नमस्कार करून कायम लीन रहावं असे तिला वाटे. तसेच घरी आलेल्या माणसाला काहीतरी देऊनच पाठवावे, तसेच विन्मुख पाठवू नये असा तिचा विचार असायचा.

माझ्या आजीने नोकरी करून आईला, मामाला वाढवले. त्यांना चांगले शिकवून मोठे केले. नंतर नोकरीचा राजीनामा देऊन पणजीआई, काकाआजोबा, आजोबा यांचा सांभाळ केला. सर्वांची काळजी घेतली. सुखाचा संसार केला, परमार्थ साधला.

माझी आजी कमालीची शिस्तप्रिय, हळवी होती. घरातलं कोणी आजारी पडलं तरी तिला फार काळजी वाटे. तिचा आवाज खूप चांगला होता. आमच्या घरी आली

की तिला गाणी म्हणताना मी पाहिले आहे. तिला परमार्थाची आवड होती. तिच्या इच्छेमुळेच मी मे महिन्यात तिच्याबरोबर बोरिवलीला उत्सवात सहभागी झालो व त्यात मला विशेष पारितोषिक मिळाले. त्या उत्सवात आम्ही सर्वांनी खूपच मजा केली.

अशा माझ्या आजीला २१ ऑक्टोबर २०१३ ला देवाज्ञा झाली व ती आम्हाला कायमची सोडून गेली. तिची आठवण आमच्या मनात कायम घर करून राहिल!

---

पान नं. २३ वरून

आपल्याकडे इतका धडधाकट देह, सर्व सोयी, ज्ञानग्रहणासाठी योग्य वय इतक्या सगळ्या जमेच्या बाजू असताना किती उदासिनता आहे आपल्यात, याची आमचीच आम्हाला लाज वाटायची.

तिचा वक्तशीरपणा, स्पष्ट बोलण्याने आम्ही भारावून जायचो. तिने बोलायला सुरुवात केली की आम्ही मंत्रमुग्ध होऊन ऐकायचो. कारण तिच्या बोलण्यात कुठेच 'मीपणा'चा लवलेश नसायचा. गुरुदेव आणि फक्त गुरुदेवच!

आपल्या आवडत्या व्यक्तीसाठी आपण काहीतरी समर्पित करतो. पण आम्ही काय समर्पित करणार? उलट असं वाटतं की आपल्यातला गलथानपणा जाऊन तिच्यातला **वक्तशीरपणा** आपल्या अंगी बाणू दे, हेच काही समर्पण असेल तर असेल.

कोण म्हणतं, 'शामलामावशी आपल्यात नाही.' नुसत्या आठवणीने आम्ही आज, आता, या क्षणाला तितकेच आनंदाने फुलून उठलोय. त्या पहिल्या भेटीतल्या, पहिल्या कथेत झालो तसेच!

आपल्या आयुष्यात काही व्यक्तीमत्त्व आपल्याला भारावून टाकतात, त्यातलीच एक शामला मावशी!

# व्यापक सद्गुरू

– सौ. अमिता पाठक

''दसरा सण मोठा नाही आनंदाला तोटा'' असे म्हणत हैद्राबादला सद्गुरू कृष्णामाईच्या जन्मशताब्दी उत्सवास जाण्याचा दिवस उगवला. ११ जणांची टिम, सर्वजण एका दशेत (आनंदात) स्टेशनवर जमा झाले. आपट्याच्या पानांची देवाण घेवाण करत (खरे तर गुरुभक्त भेटल्याचा आनंद जास्त) सिमोल्लंघनासाठी प्रस्थान केले. दुसऱ्या दिवशी दुपारी हैद्राबादला पोहोचलो. गुरूभक्त श्री. लाटकर आम्हाला घ्यायला आले. पूर्व परिचय नसून सुद्धा एकमेकांनी ओळखले. प्रेमाच्या तंतूनी सर्व गुरुभक्त बांधले जात असल्यामुळे बाह्य ओळख गौण ठरते हेच खरे. कार्यक्रमाच्या स्थळी पोहोचल्यावर गुरूभक्त आशाताई आणि सर्वांनी अतिशय प्रेमाने आमचे स्वागत केले. नंतर जेवण व थोडी विश्रांती झाल्यावर तीन दिवसाच्या कार्यक्रमाची रूपरेखा सांगण्यात आली.

दि. १४ ऑक्टों. गुरूभक्त लताताई मोघे, मुंबई यांची बोलावण्याची कथा झाली. निर्गुण सद्गुरू सगळीकडेच आहे, परंतु सगुण रूपानी आलेला भगवंत, हाच सगुण रूपात आलेले गुरुदेव आहेत व त्यांना प्रेमाने, करुणेने साद घालावी लागते. ''विकल झाले माझे प्राण...'' ह्या पदातून गुरुदेवांना बोलावणे झाले व ते आले.

दि. १५ ऑक्टो. सकाळी ६ वाजता काकडा सुरू झाला. सर्व गुरूभक्त शुचिर्भूत होऊन प्रसन्नतेने कार्यक्रमात सहभागी झाले. प्रत्येक जण स्वतंत्रपणे तसेच सामुहिकपणे आपली हजेरी लावून आनंद व्यक्त करत होता. सर्व गोपगोपींना लोण्याचा प्रसाद मिळत होता. सर्व गुरुभक्त कोणी कृष्ण तर कोणी राधा, गोपी बनून गोकुळात असल्याचा अनुभव घेत होते.

सकाळी १० वा. गुरूभक्त अंजलीताई, पुणे यांची कथा झाली. ''निजमानसी रे विचार, करी तू दगडा, तू पहिले पासून उघडा''

गुरुदेवांच्या चरणाजवळ सर्व सोडून (पूर्ण उघडे होऊन) आपला अहंकार, आशा ममता सोडून त्यांना पूर्णतः शरण गेलो की ते आपल्या शिष्यावर कृपेचा वर्षाव करतात हा त्यांच्या कथेचा भावार्थ होता.
त्यानंतर हंसराज स्वामीची पोथी झाली.

गुरूभक्त आशाताई लाटकर - हैद्राबाद ''अखंड किर्ती चिन्मयमूर्ती जगती अवतरली''
भवसागरात अडकलेल्या मुमूक्षूची आर्ततेने मारलेली हाक सद्‌गुरु ऐकतात व त्याच्या उद्धारासाठी अवतरतात व बोध, प्रबोध, निजबोध देऊन अज्ञान घालवतात. बोध घेतल्यानंतरही साधकाला अनेक अडचणीना सामोरे जावे लागते अशावेळी त्याची कीर्ति म्हणजेच गुरूदेवाचे नाम सतत स्मरणात ठेवल्यास ते तारक ठरते.

गुरुभक्त नीताताई बक्षी - इंदौर ''सर्वाभूती करूणा ऐसा संत निराळा''
आपल्या शंकांचे निरसन केले, देह मी हा जो भ्रम होता, अज्ञान होते ते काढून टाकले हे फक्त संतच करू शकतात. ते प्रपंचातून परमार्थाकडे नेतात. ते बाह्य वैराग्य कधीच बघत नाही, ते आंतरिक वैराग्य बघतात. असे संत आम्हाला लाभल्यामुळे आमचे भाग्य उदयाला आले.
अशा प्रकारे गुरुभक्त आपआपली सेवा सद्‌गुरु कृष्णामाईच्या चरणी अर्पण करत होते. त्यानंतर संध्याकाळी ७.३० वाजता हंसानंद पुरीजींची शिष्या गुरूभक्त भारतीमां यांचे एकादशीचे भजन व निरूपण झाले.
''सद्‌गुरु नायके कृपा मज केली... निजवस्तू दाविली माझी मज...'
ह्या नामदेवाच्या अभंगानी सुरुवात झाली. सद्‌गुरुंनी आपल्यावर कृपा केली आपली स्वतःची आत्मवस्तू जे आपले स्वरूप आहे, जी अनादी, अनाम अशी आहे ती सापडवून दिली व स्वरूपाचा बोध करून सुखरूप केले. असे ब्रह्मात्मैक्य फक्त सद्‌गुरुच करू शकतात म्हणून त्यांच्या चरणाला कधीही विसरू नये.

१६ ऑक्टों. सकाळी ६.०० काकडा, गवळण याने सुरुवात झाली.
त्यानंतर सकाळी ९ वाजता हंसानंद पुरीजींची पोथी
''वेदांत कळाची गूढ, तेथे माझा काय पाड''

‘आचार्य कोणाला म्हणावे’ हा पोथीचा विषय घेऊन त्यावर निरूपण केले.
संताच्या विचारांनी गेले म्हणजे आपल्याला मार्ग सापडतो. संतांना पाहिले, त्याच्याशी चर्चा केल्यास आपली स्मृती जागृत होते, सापडते. सद्गुरुला शरण गेल्यास तुम्हाला ते तुमच्या स्वरूपाची ओळख करून देतात. दोष, विक्षेप, आवरण, विस्मृतीमुळे स्वरूपापासून दूर जाणे होते. गुरूदेव ज्ञान देऊन सर्व दूर करतात. ते दैवीगुणांची पवित्र मूर्ती असतात. म्हणून रात्रंदिवस भगवंताचा विचार तळमळ यामुळे बुद्धी निश्चय करते, विवेकातून वैराग्य व मुक्ततेचा अनुभव देते.

१६ ऑक्टों. बुधवार गुरूभक्त हेमाताई भिसे - यवतमाळ
‘‘तंतू प्रेमाचा। परब्रह्माचा सगुण भगवंताचा...’’
मी सच्चिदानंद परब्रह्म आहे. स्वरूपाची ओळख करून दिली.
मी सच्चिदनंद ह्या आंतरिक प्रेमाच्या तंतूमुळे ‘मी’ वरचा धागा जोडला गेला. गुरुदेवांनी सत्यवस्तुची ओळख करून दिल्यामुळे तो तंतू एकमेकांशी बांधला गेला. ईश्वराला शाश्वत शांती सुख देता येत नाही ते त्याच्या हातात नसते. म्हणून अद्भुत (अलौकिक, ज्याला पंचभूतांचा स्पर्श नाही) असा सद्गुरु निर्माण केला. आकाश - व्यापकत्व, वायु - चैतन्यत्व, अग्नी - द्रष्टत्व, जल - शांतत्त्व व पृथ्वी-साक्षीत्व ह्या पंच अद्भूतांनी व सत, चित्, आनंद हे तीन गुण अशा अष्टधा प्रकृतीची सगुण चैतन्यमूर्ती बनली व शिष्याशी प्रेमाच्या तंतूने जोडली गेली.

दुपारी ३.३० जोडी कीर्तन गुरूभक्त अतिरेखा - इंदौर
‘‘अखंड कीर्ति चिन्मयमूर्ती जगती अवतरली’ ह्या पदाने कथेची सुरुवात झाली. संताचा एक हात ईश्वराच्या हातात तर दुसरा हात रंजलेल्या लोकांना आधारासाठी असतो. संताच्या मनात लोकांसाठी करूणा असते. ज्यांना आत्मसाक्षात्कार झाला आहे व करूणेची गंगा वाहत आहे, ते संत म्हणवले जातात. समष्टीची करूणा भाकली की ब्रह्मांडातील चैतन्याला ऐकू येते व ते जीवांच्या उद्धारासाठी भूतलावर अवतरते व ज्ञान देऊन जन्म मृत्यूचे भय काढून टाकते. ज्ञान, विवेकाने वागले तर तुम्ही मुक्तच आहात.

६.०० वाजता गुरुभक्त विजूभाऊ - यवतमाळ कथा
'मायावी ईश्वर करीतो जीवोद्धार। दिसता आकार असे निराकार...'
प्रत्यक्ष ईश्वरच आपल्या समोर सद्गुरु रूपानी आले कारण हे (ईश्वर) देखील मायावी पद आहे. देवांना देखील मुक्ती नाही. त्यासाठी त्यांना देह धारण करावा लागतो. ज्ञान घेणे सोपे असते परंतु अनुभवणे कठीण असते. मुळातील निराकार असलेले जीवाच्या उद्धारासाठी आकार धारण करतात.

रात्री ९.३० हंसानंदपुरीजी - कीर्तन
सद्गुरु कसे असतात? तुम्ही फक्त बोट दिले की ते हात पकडतात व हात दिला तर तेच रूप करून टाकतात. तसेच काहीसे झाले. गुरुभक्तांनी त्यांच्याजवळ प्रबोध व निजबोधाची इच्छा प्रगट केली. गुरुदेवांनी संपूर्ण बोध, प्रबोध, निजबोध, महाबोध सांगून सर्वांची उजळणी करून दिली व इच्छा पूर्ण केली.

दि. १७ ऑक्टों. सकाळी ६ वा. काकड्यानी सुरुवात झाली.
सद्गुरु सुमनताई - पोथी
बोध झाल्यानंतरच नरदेहाची दुर्मिळता कळते. त्यासाठी गुरु व शिष्याची जोडी असावी लागते. सद्गुरु जीवनात आल्यावर जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो. बाहेरील काही सोडायचे नाही, जे मनानी बांधले आहे ते फक्त सोडायचं आहे. देहभाव सोडायचा आहे. जाणूनी राहती अजाण ते संत. स्थिती जाणायची नाही तर अनुभवायची! एक मंत्र, एक विचार, एकच ज्ञान! तो परमात्मा मी आहे, हे अनुभवायचे.

दि. १७ ऑक्टों. गुरूभक्त शोभा काशिकर ''तो नर धन्य जगी अनुभवी...''
जो नर मी कोठून आलो? करतो काय? करायचे काय? ह्या आत्मज्ञानाचे प्रश्न जाणून ते प्राप्त करून उद्धरला जातो, तो धन्य व ते संतही धन्य! शिष्याला आत्मस्वरूपाचा अनुभव आणून देतात १) सर्वाविषयी भगवत् भाव २) सर्व सच्चिदानंद आहेत हे वाणीने वंदन ३) गुरूचे नामस्मरण ज्याच्या जवळ कायम आहे तो नर धन्य आहे.

जोडी कीर्तन - गुरुभक्त नंदा कापसे ''अखंड कीर्ति चिन्मयमुर्ती जगती अवतरली' कीर्ति संतांची, सद्गुरुची गायली जाते. संतांची कीर्ति तसेच गुरुपद अविनाशी आहे त्याचे स्वरूप चिन्मय अढळ असते. परंतू जीवाच्या कल्याणासाठी देह धारण करून येतात व शिष्याला बोध देतात. परंपरेचे निखळ ज्ञान देऊन उद्धार करतात. आमच्या जवळील ठेवा, संपत्ती आम्हाला दाखवून दिली म्हणून त्यांची अखंड कीर्ति गायली पाहिजे.

सद्गुरू सुमनताई कथा

'माझा बाप नारायण। क्षण विसंबेना आता, त्याचे पाय वंदिन माथा...'

प्रत्यक्ष सगुण गुरुदेवांनी ''गुरूतत्त्वाचे'' वर्णन करावे व सर्व गुरुभक्तांनी मंत्रमुग्ध होऊन ऐकत रहावे असेच वाटत होते. चैतन्य परमात्मा देह धारण करून आल्यामुळे आपण ओळखत नाही. परंतु जसाजसा आपला सहवास वाढतो तसे तसे त्यांचे प्रेम, त्यांचा स्पर्श, हवाहवासा वाटायला लागतो. सगुणाचे प्रेम कधीही न संपणारे आहे. गुरुरायाचे प्रत्येक अवयव हेतूपुर्ण आहेत. वरवर बघितले तर ते कळणार नाही. मुळाकडे बघितले तरच कळेल. मूळ आहे परब्रह्म! हाच मुख्य कथेचा विषय घेऊन गुरूदेवांनी कथा केली.

अशाप्रकारे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. दुपारी पंचपक्वान्नाचे भोजन झाले. प्रेमाचा रस्ता पोटातून जातो असे म्हणतात. दुसरीकडे ज्ञान भोजनाचे पक्वान्न देखील मिळत होते. संध्याकाळी सद्गुरू कृष्णा माईच्या फोटो समोर दिवे लावून केक कापण्यात आला. अशाप्रकारे अध्यात्मिक व आधुनिक पद्धतीने उत्सव साजरा झाला. रात्री टिपऱ्यांचा कार्यक्रम झाला. त्या आधी गुरुभक्त मुक्ताताईंच्या हस्ते सर्वांना 'आत्माराम /दासबोध' पुस्तक प्रसाद म्हणून देण्यात आले. ''जीवा भित्रे'' तसेच ''थांबला तो संपला'' ही नाटके व गणेश वंदना व देशभक्तीपर गीत सादर करण्यात आले व कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे सद्गुरु सुमन ताईंची कथा चालू असताना सर्व गुरुभक्तांची ब्रह्मानंदी टाळी लागली होती, तेव्हा कुठूनतरी एक सुंदर फुलपाखरू आले प्रथम महाराजांच्या डोक्यावर भिरभिरले, नंतर सर्व

पान नं. ३५ वर

# गोपाळ भेट

– लता मोघे

दिवस सोनियाचा गोपाळ भेटीचा।
काय बोलू वाचा, सखये बाई ।।धृ.।।

गोपाळ भेटीचा सुवर्ण दिन! खरचं गुरुमाऊली कोणत्या रूपाने कधी भेटतील? काही सांगता येत नाही. स.स. कृष्णाआईंच्या जन्मशताब्दी निमित्त सर्व ज्येष्ठ, श्रेष्ठ गुरुभक्त गोळा झाले. ते जेंव्हा एकमेकांना भेटतात बोलतात तेव्हा काय बोलतात? ते सर्व सामान्यांसारखे तुझ्या माझ्याच्या किंवा शिळोप्याच्या गप्पा मारीत नाहीत. तर ते एकत्र आल्यावर असा कार्यक्रम योजतात की जेणेकरून गुरुभक्त अंतर्बाह्य तृप्त होऊनच बाहेर पडेल, नव्हे नव्हे पंचपक्वान्नाचा प्रसाद असा काही अंगावर येईल की काही काळ तरी निजीनिजच लागली पाहिजे. थोडक्यात काय तर ज्ञानगंगेत ढकलूनच देतात, बसा डुंबत! अगदी तसेच झाले हैद्राबादला झालेल्या जन्मशताब्दी उत्सवात! गुरुमाऊलीला बोलावण्यापासून सुरुवात झाली. आता कसे बोलावणार त्यांना? पण त्यांना बोलावणं लागतच नाही कारण आर्त गुरुभक्तांची साद त्यांना आधीच पोहोचलेली असते म्हणून ते आधीच हजर असतात.

पण... मुळात एक असताना,

**गुरुशिष्यात्मक आपण होऊनि, आपआपणा बोधितो।**
**देव नाना मौजा करीतो। पहा तुम्ही तो ।।**

ही मौज लुटण्यासाठीच सद्‌गुरु स्वतःच शिष्य रूप धारण करून सगुणाला बोलावतात. ते वाटच पाहात असतात, शिष्य कधी साद घालतो आणि मी कधी धावत जाऊन शिष्याला जवळ घेतो, त्याला ज्ञानामृत पाजतो! कारण ''बोलावणं आल्याशिवाय जाणार नाही!'' या साठी जसा शिष्य अडून बसतो त्याचप्रमाणे सद्‌गुरू बोलावण्याची वाट पहात असतात आणि एकदा आले की सर्वत्र तेच व्यापून राहातात. मग तिथे दुसऱ्याला वाव नसतो. कारण सद्‌गुरु तत्व एकच आहे. ते सर्वांच्या हृदयात स्थानापन्न झाले. कथेनंतर गुरुभक्त भारतीमाँनी आपल्या खड्या आवाजात श्रीकृष्ण आणि राधाराणीच्या भेटीची लग्नाची पदे म्हणायला सुरुवात केली. सर्वांनी फेर धरला, टिपऱ्यांचा आवाज घुमू लागला.

प्रत्यक्षात श्री स.स. माधुरीनाथ उत्सवाला हजर नव्हते पण गुरुपदावर असलेले हसानंदपुरीजी आणि सुमनताई बाळापुरे यांच्या निरूपणातून गुरूमाऊलीच पाझरत होती.

सकाळच्या हंसानंदपुरीजींच्या 'समर्पण' या विषयावरील पोथीत तर गुरुमाऊलीची मूर्ती डोळ्यासमोरून हालत नव्हती. चर्मचक्षुंना भगव्या कपड्यातील हंसानंदपुरीजी दिसत होते, पण आम्हा सगळ्यांना गुरुमाऊलीच भासत होती.

सायंकाळच्या कथेत गुरुभक्त आशाताईंचे त्यांनी लक्ष वेधले. ''निरूपणात असताना इतरत्र लक्ष देऊ नका बरं का! आपला प्रश्न आहे तेव्हा त्याकडे आपणच लक्ष द्यायला हवे.'' तेव्हा मात्र गुरुमाऊली प्रत्यक्षच असल्याचा प्रत्यय आला, ही पद्धत त्यांचीच!

सुमनताई बाळापुरे यांची कथा व पोथी दोन्हीतून प्रत्यक्ष गुरुमाऊलीच आमच्याशी संवाद साधीत होत्या. 'प्रेरणा देऊन कार्य करवितो आणि निराळा राहतो गुरुनाथ।'

हे वाक्य ऐकले मात्र आणि पुण्याच्या मंदिरात गुरुभक्त आशाताई लाटकर, प्रभाताई लाटकर व गुरुमाऊली (माधुरीनाथ) यांच्यात झालेला संवाद आठवला. त्या म्हणाल्या होत्या,'आपल्या गुरुदेवांचा जयंती उत्सव, पुण्यतिथी उत्सव आपणच करायचा असतो. दुसऱ्यांनी करायचा व आपण हजेरी लावायची अशी आशा का?' त्याचा प्रत्यय आला. गुरुभक्त आशाताईंना प्रेरणा देऊन गुरुमाऊली निराळी राहिली.

गुरुभक्त आशाताई लाटकर, अतिरेखा, नंदाताई कापसे यांनी गुरुमूर्तीची अखंड कीर्ती गायली. गुरूभक्त अंजलीताई (पुणे), हेमाताई भिसे, विजूभाऊ बाळापुरे (यवतमाळ), बक्षीताई, शोभाताई काशीकर (इंदूर) सर्वांच्याच कथा छान झाल्या. भारतीमाँच्या कथेतील घारीच्या गोष्टीने मजाच केली.

तिसऱ्या दिवशी सुमनताईंच्या कथेनंतर स.स. कृष्णाआईंना १०१ दिव्यांनी औक्षण केले. छान अननसाचा केक कापला, आनंदाचे फुगे फुटले.

''अनुपम सोहळा सुखाचा'' भजनात सगळे बुडून गेले. प्रसाद घेता घेताच सगळ्यांनी ''जीवा भित्रे''ची झलक पाहिली आणि निश्चय झाला, आता या मार्गावर चालत राहायचे, थांबायचे नाही कारण ''थांबला तो संपला!'' आनंद रूपातच राहायचं आहे म्हणून गणेशवंदना...

एकदंताय वक्रतुंडाय गौरी तनयाय धीमही।

गजेशानाय भालचंद्राय श्रीगणेशाय धीमही।।

# करावा हाची अभ्यास...

**- प्रदीप कुलकर्णी**

हैद्राबादमध्ये दि. १५/१०/१३ ते १७/१०/१३ दरम्यान श्रीसस कृष्णाताई जन्मशताब्दी सोहळा मोठ्या उत्साहात, आनंदात व थाटामाटात साजरा झाला. उत्सवाचे आयोजन श्रीसस कृष्णाताईच्या शिष्यांनी केले होते. उत्सवासाठी मुंबई, पुणे, यवतमाळ, इंदौर, ठाणे, औरंगाबाद, नगर व बडोदा येथून आपल्या गुरुपरंपरेतील जवळ जवळ ८० ते ९० गुरुभक्त जमले होते. विशेष म्हणजे श्रीसस सुमनताई व श्रीसस हंसानंदपुरी यांची खास उपस्थिती उत्सवाचा आनंद द्विगुणीत करून गेली. जन्मशताब्दी सोहळ्याची प्रथा श्रीसस माधुरीनाथांनी आपल्या गोराई मंदिरात श्रीसस दत्तमहाराजांच्या जन्मशताब्दी सोहळ्याने सुरु केली. २००५ साली या उत्सवासाठी विविध ठिकाणांहून गुरुभक्त जमा झाले होते. उत्सवाचा आनंद अवर्णनीय होता. त्याचा पुनः प्रत्यय हैद्राबादमध्ये आला.

उत्सवाची सुरुवात दि. १४/१०/१३ रोजी गुरुभक्त लता मोघे यांच्या बोलावण्याच्या कथेने झाली. प्रत्येक भक्तामध्ये गुरु असतातच, तेव्हा हा सोहळा जरी गुरुमहाराजांचा असला तरी तो प्रत्येक भक्ताचा आहे व त्याचा आनंद सर्वांनी लुटायचा आहे असेच गुरूभक्त लता मोघे यांनी सांगितले. उत्सवाची आखणी अशी होती की तीनही दिवस सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत सर्व गुरुभक्त आनंदाच्या डोहात तरंगत होते.

**उत्सवाचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| सकाळी | ६ ते ८.३० काकड आरती |
| | ९ ते १०.०० प्रवचन |
| | १०.३० ते १२.०० कथा |
| दुपारी | २.३० ते ५.३० जोडी कीर्तन |
| संध्याकाळी | ६.०० ते ८.३० कथा |
| | ९.०० ते १०.०० भजन, नाटक इ. |

सर्वच कथा, जोडी कीर्तन व रात्रीचे भजन/नाटक अतिशय रंजक व ज्ञानात्मक

झाले. विशेष उल्लेखनीय म्हणजे श्रीसस हंसानंदपुरींचे कीर्तन जे श्रीसस बलभीम महाराजांच्या पद्धतीने म्हणजेच वारकरी पद्धतीने झाले व वेगळाच आनंद देऊन गेले. तसेच श्रीसस सुमनताईंनी गुरुदेवांची महती अतिशय सरळ सोप्या पद्धतीने कथन केली. कार्यक्रमाची मांडणी अतिशय सुव्यवस्थित होती व सर्वांचीच राहण्याची तसेच भोजनाची व्यवस्था चोख होती.

तीन दिवसांच्या या उत्सवात कळलेल्या काही गोष्टी -

१. उत्सवामध्ये गुरुभक्तांमध्ये अनुभवांचे आदानप्रदान झाले, जी एक ज्ञानचर्चा होती.

२. सर्वच कथांमध्ये सद्‌गुरूची महती सांगितली गेली. सद्‌गुरू हे स्वतः अनुभूतीत असतात व दुसऱ्यांना अनुभूती देतात. सद्‌गुरु शिष्याची भ्रांती निवारण करतात व त्याला आपल्यासारखे करतात. सद्‌गुरु हे देवापेक्षाही श्रेष्ठ आहेत, कारण प्रत्यक्ष देवही गुरुपदाची सेवा करतात. (श्रीरामाचे अध्यात्मिक गुरू-वसिष्ठ ऋषी, श्रीकृष्णाचे अध्यात्मिक गुरू - दुर्वास ऋषी). सद्‌गुरु ही साक्षात् चैतन्य मूर्ती आहे जी शाश्वत समाधान व शांती देते. सद्‌गुरु हे ज्ञानसागर आहेत. पण सर्व जाणून ते व्यवहारात अजाण राहतात. ते स्वतः सत्यस्वरूप असतात व साधकाला सत्यस्वरूप करण्यासाठी जन्म घेतात.

३. गुरुदेवांना साधकाचा कळवळा असतो. पण हे जो जाणतो तो आपले हित साधतो. करुणा केली की गुरुदेव मदत करण्यासाठी धावतात, म्हणजेच ते व्यापक आहेत.

४. गुरुदेव शिष्यामध्ये देव पाहतात पण शिष्य गुरुदेवांचा देह पाहतो. शिष्यानेही गुरुदेवांना देहाएवढे सिमित न करता व्यापकत्वाने पाहिले पाहिजे.

५. गुरुदेवांच्या सतत आठवणीने (ज्ञानस्मरणाने) अंतर्ज्ञान प्राप्ती, चित्तशुद्धी व भवभय निवारण होते.

६. गुरुचरणी दृढ निष्ठा असेल तर गुरुकृपा सहज होते.

सर्वच कथा-कीर्तन ऐकताना आपल्या सगुण सद्‌गुरु माधुरीनाथांची मूर्ती डोळ्यासमोर येत असे. काहीवेळा तर असे वाटे की प्रत्यक्ष माधुरीनाथच कथा करीत आहेत. त्यांचे अस्तित्व सतत जाणवत होते.

उत्सव संपल्यावर गाडीतून घरी येताना सहजच सोहळ्याचा आनंद डोक्यात घोळत होता. एकदम हलके हलके वाटत होते आणि खरंतर सोनाराने कान

टोचल्यासारखे वाटले. प्रत्यक्ष सगुण सद्‌गुरु आपल्याजवळ असताना, आपण त्यांचा उपयोग स्वतःच्या उद्धारासाठी करीत नाही व प्रपंचात गुरफटतो हेच कळण्यासाठी गुरुदेवांनी मला हैद्राबादच्या उत्सवासाठी धाडले होते.

## उत्सव विशेष...

**श्रीसस बलभीम महाराज पुण्यतिथी उत्सव -**

इंदिरा एकादशी दि. २८ सप्टे., ते ३० सप्टें., २०१३

**मूळपद**

प्रेमळ माय भेटली। चिंता माझी आटली।।धृ.।।
जन्म मरण जाहले मिथ्या। बोध लहरी उठली।।१।।
अंतर्बाह्य चैतन्याची। शुद्ध तुर्या दाटली।।२।।
भक्त जननी दत्त माऊली। प्रेमसुखे लोटली।।३।।

**श्रीसस माधुरीनाथ बोधतिथी उत्सव -**

अश्वीन कृ. चतुर्थी दि. २० ऑक्टो., ते २२ ऑक्टों., २०१३

**मूळपद**

सद्‌गुरु बोध रवि उदेला। अज्ञानतम नुरले।।१।।
सर्व विश्व ज्ञानमय झाले।।धृ.।।
नामरूप हे चिद्विलास। आन काही न आले।।२।।
स्थावर जंगम ज्ञानात्मक। दत्त प्रेमी कळले।।३।।

पान नं. ३९ वर

पान नं. ३० वरून

गुरुभक्तांच्या डोक्यावर म्हणजे संपूर्ण मंडपात दोनच मिनिटे फिरले व निघून गेले. जणू निर्गुणातील गुरूदेवांनी उत्सव साजरा झाल्याची पावतीच दिली!

दुसऱ्या दिवशी सर्व गुरुभक्तांचा निरोप व सोहळ्याच्या स्मृती घेऊन मुंबईसाठी प्रस्थान केले. व्यापक सद्‌गुरू कसा अनुभवायचा हे गुरूदेवांनी ह्या कार्यक्रमातून आम्हाला शिकवले.

# पहिला उत्सव? नव्हे आनंदसोहळा

**- प्रशांत शिवरकर**

रविवार दि. १३ ऑक्टो., २०१३ ला सकाळी १० ते १०.३० वा. प्रशांत व अतुल लतामावशीच्या घरी गेले. तेथे त्यांनी किती वाजता निघायचे ? कसे जायचे ? काय काय सोबत घेऊन जायचे ? याबाबत चर्चा केली.

लतामावशींनी सांगितले, 'जास्तीत जास्त ७.०० वाजेपर्यंत निघू.' 'दसरा असल्याने मंदिरात कथा असणार, कथा संपल्यावर निघायचे का ?' असे आम्ही विचारताच 'नाही, नाही, कथा चालू असेल तरी आपण कोणालाही डिस्टर्ब न करता नमस्कार करून जाऊ' असे मावशीने सांगितले.

प्रशांत घरी गेल्यावर थोडा टेन्शनमध्येच होता. कारण प्रशांतने अजूनपर्यंत इतक्या लांबचा प्रवास कुटुंबाबरोबर तर सोडाच पण एकट्याने म्हणजे मित्रांसोबत पण केला नव्हता. पण सोहळ्याविषयी उत्सुकता फार होती. परंतु रेश्मा, मैत्रेयी व सोहिरा आम्ही सर्वजण सध्या राहत असलेल्या जागी नव्यानेच राहत होतो. त्यामुळे त्यांची काळजी वाटत होती. त्यातच मैत्रेयीला (मुलीला) आदल्या दिवशी रात्री प्रशांतने सांगितले की, ''लतामावशीसोबत बाहेर जाणार आहे.'' मैत्रेयी म्हणाली,'बाबा, तुम्ही किती दिवस जाणार ? रात्री झोपताना आम्हाला गादी कोण घालून देणार ?'' मैत्रेयीची कशीबशी समजूत घातली, पण प्रशांत अजूनच विचारात पडला.

खरं तर प्रशांत हैद्राबादला जाणारच नव्हता. सोहिरा व मैत्रेयी लहान असल्यामुळे प्रशांतचे व रेश्माचे जाणे नक्की नव्हते.

परंतु गुरुदेवांचे अमेरिकेला जायचे निश्चित झाल्यानंतर अचानक कथा संपल्यावर गुरुदेवांनी प्रशांतला हैद्राबादला उत्सवाला जाण्यास सांगितले. प्रशांत द्विधा मनःस्थितीत होता. गुरुदेवांनी सांगितले ना, आता कसलाच विचार करायचा नाही, काळजी करायची नाही असे वाटले नी उत्सवाच्या तयारीला प्रशांत लागला. ऑफिसमध्ये काम करणाऱ्या सहकाऱ्यांना महिन्यापूर्वीच कल्पना देऊन ठेवली. त्याप्रमाणे कामाचे व रजेचे नियोजन करून ठेवले. लता मावशी, अविनाश काका, अमिता काकू, निशांत, अपर्णा, हेमा, सिद्धेश, अतुल, प्रदीप काका, सुधीर काका येणार असल्याचे

गुरुदेवांनी सांगितले. मंदिरातील उत्सवाव्यतिरिक्त बाहेरगावी कोणत्याही उत्सवात प्रशांत कधी गेला नव्हता. एक चांगलीच संधी गुरुदेवांनी प्रशांतला दिली. रेश्मा उत्सवाबद्दल नेहमीच सांगत असते. ती बऱ्याच उत्सवांना गुरुदेवांबरोबर गेली होती. तिने सांगितले, 'अविनाश काका आहेत ना! मग तर खूपच धम्माल.' रेश्मा अविनाश काका व इतर उत्सवाबद्दल खूप काही सांगत असे. हैद्राबादला जाण्याची उत्सुकता दिवसेंदिवस वाढतच होती.

रविवारी दुपारी ३.३० ते ४.०० वाजता सिद्धेश तयारी झाली का हे पहाण्यास घरी येऊन गेला. टेन्शन वाढतच होते.

टिकटिक वाजते डोक्यात, धडधड वाढते ठोक्यात असे चालले होते.

रिक्षा-रेल्वे-टॅक्सीने प्रवास करून आम्ही चौघेजण (प्रशांत, लता मावशी, सिद्धेश व अतुल) छत्रपती शिवाजी टर्मिनसला पोहोचलो. मावशीच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.

९.२५ च्या सुमारास गाडीत बसल्यावर थोडी चेष्टा मस्करी सुरू झाली. अविनाश काका, अमिता काकू हे घरून येताना सर्वांकरीता जेवण घेऊन आले होते. गाडी सुरु होताच अमिता काकूंनी जेवण वाढण्याची जबाबदारी घेऊन सर्वांना पोटभर जेवण दिले.

सोमवार दि. १४ ऑक्टो., रोजी नामपल्ली म्हणजेच हैद्राबाद स्टेशनला आमची गाडी पोहोचली. स्टेशनच्या आवारातच श्री. लाटकर काका गाडी घेऊन आमची वाट पाहत होते. त्यांच्या गाडीत बसून चारमिनार, मक्का मस्जिद या मार्गाने आम्ही वेलजी मंदिर, छत्री नाका येथे पोहोचलो.

गुरुभक्त आशाताई लाटकर, प्रभाताई लाटकर व सर्वांनी आमचे चांगल्या प्रकारे स्वागत केले. फ्रेश होऊन प्रसाद घेऊन अविनाश काकांच्या मदतीने बोलावण्याच्या कथेच्या तयारीच्या दृष्टीने कामाला लागलो.

उत्सवाकरीता पुणे, यवतमाळ, इंदौर इ. ठिकाणाहून ज्येष्ठ गुरुबंधु/भगिनी आले होते. यवतमाळचे श्रीसस सुमनताई व अहमदनगरचे श्रीसस हंसानंदपुरी आले होते. सोमवारी संध्याकाळी गुरूभक्त लता मोघे यांच्या बोलावण्याच्या कथेने सुरुवात झाली. खऱ्या अर्थाने उत्सव मंगळवार दि. १५ ऑक्टो., २०१३ पासून सुरू झाला.

श्रीसस हंसानंद पुरीजी यांचे प्रवचन झाले. आचार्य म्हणजे काय? गुरुपद केव्हा

प्राप्त होते? ह्याचे वर्णन त्यांनी केले. ‘अनुभव स्वयंसिद्ध आहे’ ह्याची जाणीवही दिली नंतर सुरू झालेल्या कथेत गुरुभक्त अंजलीताईंनी ‘नाही’ हा मायेतील शब्द असून ‘नाही म्हणू नये’ ह्याचे सुरेख वर्णन केले.

नंतरच्या जोडी कीर्तनात गुरुभक्त आशाताई लाटकर यांच्या कथेतून नामस्मरणाने चित्तशुद्धी, मोक्षमुक्ती व भवनिवारण होते हे लक्षात आले.

गुरुभक्त भारती माँ, देवगाव यांनी सप्तकोष व गुण यांचे वर्णन केले.

दुसऱ्या दिवशी श्री हंसानंदपुरीजी यांच्या प्रवचनात आचार्य/महात्मे हे ईश्वरपेक्षाही श्रेष्ठ असतात हे सांगितले गेले.

गुरुभक्त हेमाताई भिसे यांचे ‘तंतू प्रेमाचा’ हे वर्णन कथेत झाले. नंतर जोडी कीर्तनात गुरुभक्त अतिरेखा, इंदौर यांची कथाही छान झाली.

पुढील कथेत गुरूभक्त विजूभाऊंनी घडविणारा एकच असतो पण घडणाऱ्याने कसे घडावे यावर अवलंबून असते हे समजले. तसेच ज्ञान नुसतेच न घेता जीवनात उतरवता आले पाहिजे याचे वर्णन आले. श्रीसस हंसानंद पुरी यांच्या कथेमध्ये बोध, प्रबोध, निजबोध व महाबोध सांगण्यात आला.

नंतर गुरुभक्त शोभाताई काशीकर (इंदौर) यांचे कीर्तन चांगले झाले व गुरुभक्त नंदाताई कापसे व लता मोघे यांचे जोडी कीर्तनही छान झाले. श्रीसस सुमनताईंनी प्रवचनातून ज्ञान, अभ्यास व अनुभव ज्याचा आहे त्याचाच आहे, तो कोणाकरीता नसतो हे सांगितले. तसेच गुरुदेवांच्या क्रियेतून मिळणारे प्रेम अवर्णनीय असते व माऊली करुणामूर्ती आहे हेच सांगितले. श्रीसस सुमनताई यांनी कथेमध्ये आपण मायेला धरतो तर गुरुदेव माया धारण करतात हेच सांगितले.

यानंतर शेवटच्या दिवशी केक कापण्याचा कार्यक्रम झाला. महाप्रसादानंतर मुंबईकरांनी ललित सादर केले व नंतर टिपऱ्या झाल्या. अशाप्रकारे उत्सवाची सांगता झाली.

गुरुदेवांनी प्रशांतला हैद्राबाद उत्सवाला जायला सांगून एक अपूर्व सोहळा पाहण्याची संधी दिली. जरी हा पहिला उत्सव (प्रशांतचा) होता, तरी तसे वाटत नव्हते. कारण गुरुदेवांनी मंदिरात या सर्व गोष्टी शिकविल्याच होत्या. मंदिरातल्या उत्सवात काहीना काही जबाबदारीचे काम देऊन ते करवून घेणे, निर्णयाचे स्वातंत्र्य देणे हे फक्त गुरुदेवच करू शकतात.

वेदांताची भाषा किंवा बोधामध्ये काय सांगितले याबाबत प्रशांतला थोडेफार लक्षात आहे, श्रवणामुळे! परंतु अभ्यासातील शंका न विचारता प्रपंचातील शंका व अडचणी विचारल्या जातात याची जाणीव झाली.

गुरुतत्त्व एकच आहे. आपण एक आणि एकच आहोत. द्वैत पाहायचे नाही हे प्रत्यक्ष आचरणात आणणे कठिण आहे. पण महाराज ते आपल्या नकळत करवून घेत असतात.

प्रशांतने attend केलेले उत्सव, तीन-तीन दिवसांची शिबिरे इ. मुळे थोडे फार लक्षात राहून विचार करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे हैद्राबाद उत्सवामध्ये बिनधास्तपणे वावरणे झाले.

आई असणे व आईसारखे असणे यात जो फरक आहे तोच फरक गुरुदेव व इतरांमध्ये आहे. आपल्याला घडविले ते फक्त गुरुदेवांनीच! प्रशांतने हे लिखाणही पहिल्यांदाच केले आहे.

एका उत्सवाला पाठवून महाराज शिष्याला कसे घडवित असतात ते एक महाराजच जाणे!

---

पान नं. ३५ वरून

**श्रीसस दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**

कार्तिक शु. ९ ते कार्तिक कृ. १ दि. ११ ऑक्टों., ते १८ ऑक्टों., २०१३

**मूळपद**

देहात असावे देह न व्हावे। इंद्रियी खेळावे पहाते व्हावे।।१।।
प्रपंची रमावे अलिप्त असावे। विषय भोगावे अभोक्ता जाणावे।।२।।
गणगोतासी माझे म्हणावे। माझे नव्हे ऐसे समजुनी रहावे।।३।।
नामरूप पुसता खुशाल सांगावे। ज्याचे त्याकडे सोपूनी द्यावे।।४।।
प्रारब्धावरी स्वस्थ बसावे। सुख दुःख येता सम राहावे।।५।।
सर्वी असावे सर्वी मिळावे। सर्वाहुनी पर साक्षी असावे।।६।।
अध्यात्म ऐकावे परिक्षिती व्हावे। भजन करावे सार शोधावे।।७।।
माया अविद्या मिथ्या जाणावे। परब्रह्म ते होवुनी रहावे।।८।।
दत्ता भागिरथी ज्ञानात शिरावे। प्रेम भक्तिच्या रंगात रंगावे।।९।।

# सच्चिदानंद आपण...

**- निशांत पाठक**

जसे गुरुमंदिरात सर्व एकमेकांना घेऊन चालतात व एकाच परिवारातील असल्याप्रमाणे वावरतात, तसेच व्ही.टी. स्टेशनला पोहोचल्यावर वाटले व तोच अनुभव संपूर्ण उत्सवात कायम राहिला.

हैद्राबाद स्टेशनवर उतरल्यापासून ते उत्सव संपेपर्यंत गुरुदेवांनी सर्वांचीच वेगवेगळ्या रूपात व प्रकारांनी व्यवस्था केली. तिथे आमचे स्वागत मनापासून झाले. त्या स्वागतातच इतका आपलेपणा होता की त्या एका कृतीने सर्वांना आपलेसे करून घेतले. ह्यामुळेच आम्ही सहजतने वावरू शकलो.

गुरुपदावर असलेल्या गुरूमहाराजांनी व गुरुभक्तांनी निरनिराळ्या पद्धतीने वेदांत मांडला. त्याचा खूप आनंद घेता येत होता. जसे लहान मुलासमोर वेगवेगळ्या पॅकमधले पण चॉकलेटच ठेवण्यात येते व ते बघून जसा आनंद त्याला होतो, तोच आनंद अनुभवत होतो. जसा अत्तराचा सुगंध नकळत मिसळला जातो, तशीच सगळ्या गुरुभक्तांची वागणूक होती. सर्व गुरुभक्तात असलेला सच्चिदानंद फुलल्याचा अनुभव अनेक रूपाने आला.

कथा, पोथी संपल्यानंतर गुरुभक्तांशी चर्चा करीत असताना त्यांचे विचार अनुभवता आले. आपलेच कार्य असल्यासारखे वाटत होते. मग ते जेवण वाढणे असो, माईकची व्यवस्था असो, प्रसाद वाटणे असो! सर्व सेवा सहजपणे होत होती. प्रत्येक पोथी, कीर्तनातून फक्त 'घट्ट' वेदांताचे सारच मिळत होते. अनोळखी मुले सुद्धा आमच्या आनंदात मिसळली होती. प्रत्येकात सच्चिदानंद पहावे हे ह्या उदाहरणाने समजले. 'जीवा भित्रा' व 'थांबला तो संपला' ही नाटके सादर करताना समोर अनोळखी चेहरे असून सुद्धा मनामध्ये भीती वाटली नाही. जसे आपल्या मंदिरात होते तसेच सादर केले गेले.

ह्या सोहळ्याचा आनंद आम्ही भोगू शकलो. गुरुदेवांनी दिलेले विचार, दृष्टीकोन व त्यांच्या मुखातून केलेले श्रवण ह्यामुळेच हे शक्य झाले.

# प्रेमभक्ती...

**- अविनाश पाठक**

रामकृष्णाच्या कथा पुराणात फक्त मार्गदर्शनासाठी असतात असा काहीसा समज आहे, पण त्या प्रत्यक्षात पण घडत असतात व त्याचा आनंद घेऊन पुढे ध्येयाकडे सरकायचे असते. असाच काहीसा अनुभव आला सद्‌गुरू कृष्णामाईंच्या जन्मशताब्दी उत्सवात! तीन दिवसांचा खेळ, स्थळ हैद्राबाद.

हैद्राबादच्या काही गुरूबंधुंची तोंड ओळख सद्‌गुरू दत्तमहाराजांच्या जन्मशताब्दी उत्सवात झाली होती. जसे क्रिकेट मध्ये एकामागोमाग एक शतके झळकावल्याचा आनंद मिळतो, त्याचप्रमाणे मुंबई, पुणे, यवतमाळ व नरसिंगडचे उत्सव पार पडले. प्रत्येक उत्सवात एक एक देह सोडावा व महाकारणाच्या पलिकडे आनंदात स्थिर झाल्यावरही ज्ञानाहंकार येऊ नये म्हणून की काय ही गुरुदेवांची लीला! ज्याप्रमाणे रामदासांनी 'कल्याण स्वामी'ना व श्रीकृष्णानी 'उद्धवाला' गोकुळात एकटच पाठवलं. त्याचप्रमाणे मुंबईहून हैद्राबादला निघताना अनुभवले. फरक एवढाच होता, आधुनिक जगात हातात पत्राचीही गरज नव्हती तर अगोदरच फोनवर निरोप पाठवून स्वनियोजन केले होते.

जाण्यासाठी तयारी, विचार विनीमय सुरुवात झाली. एकूण ११ गोपगोपी जाण्यास सज्ज झाले. लगेच प्रश्न उठला की 'उद्धव' तर एकटाच गेला होता. गोकुळात! पण ११ म्हणजे एकादशीच की हो! जशी सुटीसुटी बुंदी एकत्र करून लाडू तयार होतो किंवा फुलांचे हार तयार होतात, त्याप्रमाणे आम्ही सगळे जण १३ ऑक्टो,ला सीएसटी रेल्वे स्थानकावर जमलो. त्यात बडोद्याचे गुरुबंधू अनिल डोंगरे व त्यांची पत्नी यांचा समावेश झाला. प्रवासात मज्जामज्जा करून गुरूगीता वाचत प्रवास सुखकर झाला. दुपारी १२.१५ वाजता हैद्राबादला पोहोचलो. चातकाप्रमाणे आतुरतेने श्री. लाटकर आम्हा सर्वांची वाट बघत उभे होते. एकमेकांना कधीही बघितले नसताना तसेच हातात नावाचा फलक नसतानाही आम्ही त्यांना ओळखले. आणखी एक बुंदीचा लाडू लाडवात मिसळला (अंतरिक प्रेमाचा धागा हातात असला की बाहेरील रूपाला ओळखण्याची गरज लागत नाही.) गुरूभक्त लाटकर आम्हा सर्वांना घेऊन हैद्राबाद स्टेशनपासून ८ ते १० कि. असलेल्या उप्पुगुडा ह्या कार्यस्थळावर घेऊन निघाले.

वाटेतच चारमिनारचे दर्शन घेत पुढे सरकलो. कार्यस्थळी पोहोचताच चालू असलेली लगबग व हातातील कामे बाजुला टाकून प्रेमाने आदरसत्कार करण्यासाठी सर्वजण पुढे आले. लाडू हळूहळू मोठा होत चालला होता. कार्यस्थळ निसर्गरम्य व प्रशस्त होते. त्यामुळे आणखीनच मजा वाटली. सगळ्या पाहुण्यांची सोय लावून कार्यक्रमाच्या पूर्वार्धाला सुरूवात होत होती. अल्पोपहार व थोडा आराम झाल्यावर लगेचच गुरुभक्त लता मोघे यांची बोलावण्याची कथा झाली. 'भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी,' याचप्रमाणे हैद्राबाद व मुंबईचे गुरूबंधू, एकमेकांत मिसळून आपला उत्सव आनंदाने पार पडला पाहिजे त्यासाठी राहिलेली साफसफाईची कामे, स्टेज बनवण्याचे काम, लाऊडस्पीकरचे काम, गुरूदेव कृष्णामाईंचे आसन (फोटो) तयार करण्याचे काम, फुलांचे डेकोरेशनचे काम व बाकीच्या केंद्रावरून येणाऱ्या गुरुभक्तांचे आदरातिथ्य व सोय लावून देण्याचे काम करीत होते. गुरुदेवांच्या शिकवणीप्रमाणे एकत्वाचे सुव्रत गाठीला बांधून अबालवृद्ध व तरुण गुरूभक्त कामाला गुंफले गेले. रात्री उशिरापर्यंत जागून सुंदर फुलांची आरास करून सजवण्यात आली. दुसरीकडे मधून मधून येणाऱ्या गुरुभक्तांची रीघ चालूच होती. आनंदामध्ये शरीर थकत नाही याचा अनुभव म्हणूनच की काय नाच, गाणी, अभंग यांची लुट झाली. उशीराने सर्व दमून झोपले. मुंबई, पुणे, नाशिक, आळंदी, साडेगाव, यवतमाळ, इंदौर येथील वाढत्या उपस्थितीमुळे सकाळी चार वाजल्यापासूनच प्रातःकार्यासाठी रांगा लागत होत्या. १५ ऑक्टो., दिवस १ला सुरुवात सकाळी काकड आरतीने झाली. यावेळी पुणेकरांनीच त्याची जबाबदारी घेतली. देवस्थापना झाली व सकाळची पहिली पोथी श्री हंसानंद पुरीजी यांच्या सुंदर निरूपणाने झाली. अल्पोपहार झाल्यावर पुण्याच्या गुरूभक्त अंजलीताईंची कथा सुंदर ठेक्यात झाली. लगेच जोडी कीर्तनाला सुरुवात झाली. काही गुरुभक्तांची ब्रह्मानंदी टाळी लागे व काही भक्त एकादशीचे जागरण करीत. गुरूभक्त आशाताई लाटकर व नीता बक्षी यांच्या कथा पार पडल्या. दुपारी चहाने झोप उडवत लगेचच श्रीस हंसानंद पुरी यांच्या शिष्या गुरूभक्त भारती यांची वारकरी पद्धतीने टाळ मृदुंगात कथा दुमदुमली.

१६ ऑक्टो. सकाळी काकडा-आनंदाची भरती आली, सर्वांनी गवळणी नाचून आनंद लुटला. नित्यावळी वाचन झाल्यावर सकाळी ९.३० वाजता पोथी निरूपण

झाले. (पोथीचा विषय - आचार्य कोणाला म्हणावे? संत, सद्‌गुरु व आचार्य यावर विवेचन) त्यानंतर गुरुभक्त हेमाताई भिसे यांची कथा झाली. त्यानंतर जोडी कीर्तनात, गुरुभक्त अतिरेखा इंदौर व विजुभाऊ यवतमाळ यांच्या सुश्राव्य कथा झाल्या. घनघन विठ्ठलाला जाणण्यासाठी श्रवणाची घणघण न थांबता चालूच होती. गुरुभक्त आशाताई लाटकर यांनी निजबोधाची इच्छा प्रगट केल्याने हंसानंद स्वामीनी बोध, प्रबोध, निजबोध व महाबोध यावर उजळणी करवली.

१७ ऑक्टो. 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' याप्रमाणे सकाळी काकडा, गौळण, नित्यावली झाल्यावर लगेच आनंदाचा पुढचा डबा जोडला गेला. श्री सद्‌गुरू सुमन ताईंची पोथी झाली. स्वतंत्र कथा गुरूभक्त शोभा काशीकर इंदौर याची झाली. पुढे जोडी कीर्तनात गुरुभक्त नंदा कापसे, इंदौर व लता मोघे, मुंबई यांच्या कथा झाल्या. सगळ्यात कळस सुमन महाराजांची अनुभवात्मक कथा झाली. सगुणाची महती वर्णिली गेली व उत्सवाची सांगतेकडे वाटचाल सुरू झाली. प्रसादरूपी प्रेमाचा गोड बुंदीचा लाडू पूर्ण झाला व कृष्णामाईंच्या चरणी अर्पण केला. त्याचप्रमाणे वाढदिवसानिमित्त केक व १०१ दिवे लावण्यात आले व सर्व लहान थोरांनी फुगे फोडून व केक एकमेकाला भरवत काला साजरा केला. मुंबईकरांची सेवा म्हणून ''जीवा भित्रे'' व ''थांबला तो संपला'' ही दोन उपदेशात्मक लळिते सादर करण्यात आली. उत्सवाची सांगता झाली. 'निरोप कसला माझा घेता। जेथे जाल तेथे मीच असता।' तरी सुद्धा साश्रू नयनांनी एकमेकांना निरोप देण्यात आले. उत्सवाचा लाडूचा प्रसाद व आठवण म्हणून 'दासबोध'/'आत्माराम' ग्रंथ व अज्ञान पुसण्यासाठी वस्त्र बहाल करण्यात आले. हळूहळू लाडू फुटल्याप्रमाणे प्रत्येक बुंदी (गुरुभक्त) आपआपल्या दिशेने प्रेमाचा, अनुभवाचा, तृप्तीचा साठा घेऊन गेले. एकामेकाला सोडण्याची तयारी नव्हती म्हणून परत परत भेटण्याच्या निमित्ताने सगुण सगुणाशी भेटत होता. हैद्राबाद गुरुभक्तांमध्ये स्त्रीवर्गाची उपस्थिती जास्त होती. तरीपण खऱ्या अर्थाने पुरूषार्थ करत कार्य सिद्धिला नेले, गोपीभावाने! कुठेही कोणाला कमी पडू नये याची कटाक्षाने काळजी घेत प्रेमभक्तीचे दर्शन घडवले. आम्ही सर्व हजर गुरुभक्त हृदयात आनंद साठवून स्मृती जपत परतीच्या मार्गाला लागलो. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण!

गुरुभक्त श्री. भालचंद्र प्रल्हाद बल्लाळ वय वर्षे ६८ यांनी दि. ७ डिसेंबर २०१३, मार्गशीर्ष शु. ५ शके १९३५ रोजी यवतमाळ येथे राहत्या घरी देह ठेवला.

ते चंद्रपूरला 'व्हिनस ऑर्केस्ट्रा'मध्ये कीबोर्ड व गिटार या वाद्यांची साथ करीत. त्यांना टेबलटेनिस या खेळाची आवड होती. बासरी वादनातही त्यांचा हातखंडा होता. २००४ साली ११ एप्रिल रोजी ते श्रीसस माधुरीनाथांना शरण गेले. नात्याने सुनबाई असल्या तरी गुरुदेवांच्या ठिकाणी त्यांची नितांत श्रद्धा होती.

'जसे ताईने (आईने) मला दरडाच्या शाळेत घातले होते, तसे राणीने (मुलीने) वेदांताच्या शाळेत घातले आणि अशी व्यक्ती प्रत्येकाला मिळणे आवश्यक आहे,' असे ते म्हणत. २००५ साली सर्वशाखीय ब्राह्मणसभा, यवतमाळ तर्फे सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणारे ज्येष्ठ नागरिक म्हणून त्यांचा सत्कार झाला. २००६ साली अवधूतवाडी गणेशोत्सव मंडळ, यवतमाळतर्फे 'श्रावणगाणी' या कार्यक्रमात सामाजिक उपक्रमाबद्दल त्यांना मानचिन्ह देण्यात आले. २६ सप्टेंबर २०१३ साली सहाव्या वर्धापनानिमित्त 'सिनेरसिक मंचा'तर्फे मंचाचे संस्थापक, ज्येष्ठ सदस्य, उत्तम गायक, कलावंत, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता म्हणून स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार झाला.

त्यांच्या स्मृतीस सादर प्रणाम!

– सर्व गुरुभक्त

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

श्री अमृतबोध

BOOK-POST

To,

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**

पौष कृ.१ दि. ९ जाने. ते १८ जाने. २०१४

**महाशिवरात्र उत्सव**

माघ कृ १३ दि. २४ फेब्रु. ते २७ फेब्रु.२०१४

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**

रंगपंचमी फाल्गुन वद्य ५

दि. १३ मार्च ते २२ मार्च २०१४

**नृसिंह जयंती उत्सव**

वैशाख शु. १३ दि. ९ मे ते १५ मे २०१४

**गुरुपौर्णिमा उत्सव**

आषाढ शु. १५ दि. ४ जुलै ते १३ जुलै २०१४

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**

श्रावण शु. १३ परम १४

दि. २ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट २०१४

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**

कार्तिक कृ. १

दि. ३० ऑक्टो. ते ८ नोव्हें २०१४

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्रीहनुमान जयंती** | - चैत्र पौर्णिमा |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व. १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ. १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व.१ ते ९ |